रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३१६
www.ramprahar.com

◆ गुरुवार, ४ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत महाराष्ट्र देशात टॉपर/२
'राजमुद्रा'ची रुग्णवाहिका रोहेकरांच्या सेवेत दाखल/५
उरणच्या खेळाडूंची महाराष्ट्र आईस हॉकी संघात निवड/८

## तृणमूल काँग्रेसमध्ये उभी फूट, वेगळ्या गटाला मान्यता



**कोलकाता** : पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. पक्षामध्ये बंडखोरी करणारे आणि आपल्यामागे सुमारे ६०च्या आसपास आमदारांचा पाठिंबा असल्याचा दावा करणारे ऋतब्रत बॅनर्जी यांना विधानसभा अध्यक्षांनी विरोधी पक्षनेते म्हणून मान्यता दिली आहे. विधानसभा अध्यक्षांनी ऋतब्रत यांच्यासोबत असलेल्या आमदारांच्या गटाला स्वतंत्र गट म्हणून मान्यताही दिली आहे. त्यामुळे आता तृणमूल काँग्रेसमधील फुटीवर अधिकृतरीत्या शिक्कामोर्तब झाले आहे. याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार पश्चिम बंगाल विधानसभेत तृणमूल काँग्रेसच्या निवडून आलेल्या ८०पैकी ६० आमदारांनी ममता बॅनर्जी यांनी नियुक्त केलेल्या शोभनदेव चटोपाध्याय यांना विरोधी पक्षनेते मानण्यास नकार दिला. त्यानंतर ऋतब्रत व सहकारी आमदारांनी वेगळा गट स्थापन केला आहे.

# दिल्लीत अग्नितांडव

## रेस्टॉरंटमधील आगीत २१ जणांचा होरपळून मृत्यू



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राजधानी दिल्लीतील मालवीय नगरमध्ये एका रेस्टॉरंटमध्ये बुधवारी (दि.३) सकाळी लागलेल्या आगीत २१ जणांचा होरपळून मृत्यू झाला. या दुर्घटनेत अनेक लोक गंभीर जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दिल्लीतील लेमन ग्रीन नावाच्या रेस्टॉरंटमध्ये बुधवारी सकाळी ८च्या सुमारास आग लागली. याबाबत माहिती मिळताच अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली आणि तेथील इमारतीमधून ३७ नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले, मात्र या आगीत २१ जणांचा मृत्यू झाला असून अनेक लोक गंभीर जखमी झाले आहेत.

आगीच्या घटनेबाबत माहिती देताना अधिकाऱ्यांनी सांगितले की, इमारतीत आग वेगाने पसरल्यानंतर बाहेर पडण्याचे सर्व मार्ग बंद झाले होते. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी इमारतीसमोरील जमिनीवर गाद्या टाकून बचावाची व्यवस्था केली. त्यानंतर अनेकांनी जीव वाचवण्यासाठी बाल्कनी, खिडक्या आणि इमारतीच्या वरच्या मजल्यांवरून खाली उड्या मारल्या. ४० जणांना सुखरूपपणे वाचविण्यात यश आले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दुर्दैवाने या घटनेत २१ जणांचा मृत्यू झाला.

आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. जखमींपैकी काहींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

दुर्घटनेबद्दल दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी शोक व्यक्त केला आहे. 'मालवीय नगरातील भीषण आगीत झालेल्या जीवितहानीबद्दल अतिशय दुःखी आहे. माझ्या सहवेदना मृतांच्या कुटुंबीयांसोबत आहेत. या संकटातून, दुःखातून बाहेर पडण्याचं बळ त्यांना मिळो. जखमींना लवकरात लवकर आराम पडावा यासाठी मी प्रार्थना करते,' अशा भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केल्या आहेत.

दरम्यान, या प्रकरणात धक्कादायक उलगडा झाला आहे. या हॉटेलला दिल्ली सरकारकडून बेड अँड ब्रेकफास्ट संकल्पनेच्या अंतर्गत परवाना जारी करण्यात आला होता. त्यानुसार केवळ सहा खोल्यांची परवानगी देण्यात आली होती, पण हॉटेलमध्ये प्रत्यक्षात २५ खोल्या होत्या. म्हणजेच १९ खोल्या अतिरिक्त होत्या. इतकेच नव्हे तर सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवून काही खोल्या बेसमेंटमध्येही तयार करण्यात आल्या होत्या. याबाबत तपास केला जात आहे.

# मराठा आरक्षणासंदर्भात कक्ष स्थापन होणार

## राज्य सरकारकडून हेल्पलाइन क्रमांक सुरू : मंत्री विखे-पाटील

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासंदर्भात कक्ष स्थापन करण्यात येणार असून आरक्षणासंदर्भातील नोंदी शोधणे, कुणबी जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र आदींबाबत नागरिकांना सहाय्य करण्यासंबंधी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये हेल्पलाइन क्रमांक सुरू करण्यात येणार आहे तसेच प्रमाणपत्रासंदर्भात अडचणी दूर करण्यासाठी मंत्रालयातील कार्यालयात ९३२६५६२८१५ हा हेल्पलाइन क्रमांक सुरू केला असून कार्यालयीन वेळेत या क्रमांकावर संपर्क साधता येईल, अशी माहिती जलसंपदामंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) आणि मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिली.

मराठा आरक्षण उपसमितीची बैठक मंत्री विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच मंत्रालयात झाली. या बैठकीस उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत, सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंह भोसले, पर्यटनमंत्री शंभूराज देसाई, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, फलोत्पादनमंत्री भरत गोगावले, मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद जाधव-पाटील, आमदार प्रसाद लाड, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी प्रत्यक्ष तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.



### न्यायमूर्ती शिंदे समितीला मुदतवाढ

न्यायमूर्ती शिंदे समितीला ३० जून २०२७पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ उपसमितीने घेतला असून सारथी समितीमार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संस्थेचे बळकटीकरण करण्यावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून व्याज परतावा अदा करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत आणि महामंडळाच्या कामाबाबत तसेच नवीन प्रकरणांना मंजुरी देताना होणारे दायित्व विचारात घेऊन पुढील पाच वर्षांचा आराखडा तयार करण्याच्या दृष्टीनेही यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

मंत्री विखे-पाटील म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या प्रश्नासंदर्भात दिलेल्या आश्वासनांची पूर्तता निर्धारित वेळेत करण्यासाठी सर्व विभागांनी प्रशासकीय स्तरावर समन्वयाने कार्यवाही सुरू करावी. मराठा आरक्षणाच्या प्रश्नाबाबत संवेदनशीलतेने निर्णय होण्याच्या दृष्टीने अधिकाऱ्यांनी गांभीर्याने काम करावे. हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर वेळप्रसंगी कारवाई करण्यात येईल.

न्यायमूर्ती शिंदे समितीने शोधलेल्या नोंदी, शिंदे समितीच्या स्थापनेनंतर १३ लाख दाखल्यांचे झालेले वितरण तसेच समिती स्थापन होण्यापूर्वी कुणबी प्रमाणपत्राचे झालेले वाटप याची माहिती जिल्हा आणि तालुका स्तरावर तातडीने संकलित करावी. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्तांनी दाखले वितरित करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे पुढील तीन महिन्यांमध्ये गृहभेटी, विशेष शिबिरे आयोजित करून याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांच्यावर निश्चित करावी. या कामाचा आढावा दर आठवड्याला घेण्यात यावा, अशा सूचनाही मंत्री विखे-पाटील यांनी दिल्या.


जात पडताळणी प्रमाणपत्र वितरित करण्याबाबत दर १५ दिवसांनी विभागीय आयुक्त आढावा घेतील, असे सूचित करून मंत्री विखे-पाटील म्हणाले की, मराठा आरक्षण कक्ष स्थापन करणे, आंदोलनादरम्यान मृत्युमुखी पडलेल्या आंदोलकांच्या वारसांना अर्थसहाय्य देण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी. जिल्हाधिकारी कार्यालयात कुणबी प्रमाणपत्र मिळण्याबाबत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी हेल्पलाइन नंबर पुढील आठ दिवसांत कार्यान्वित करावा. शासन निर्णयानुसार स्थापन करण्यात आलेल्या ग्रामस्तरीय समितीच्या कामांचा आढावाही जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावा, असे निर्देशही यावेळी देण्यात आले.

# ज्येष्ठ उद्योजक कान्हाशेठ ठाकूर यांचे निधन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्येष्ठ उद्योजक कान्हाशेठ ठाकूर यांचे बुधवारी (दि.३) वयाच्या ७२व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. ते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सख्खे चुलत बंधू आणि आमदार प्रशांत ठाकूर व नगरसेवक परेश ठाकूर यांचे काका होते. त्यांच्या निधनाने ठाकूर कुटुंबीयांसह सामाजिक, राजकीय आणि व्यावसायिक क्षेत्रात शोक व्यक्त होत आहे.

पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी येथे जन्मलेल्या कान्हाशेठ ठाकूर यांनी प्रतिकूल परिस्थितीत लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली उद्योगधंद्यात जम बसविला. एकेकाळी मचव्यातून रेती व्यवसाय करीत असलेले



कान्हाशेठ नंतर रेल्वेचे प्रसिद्ध ठेकेदार म्हणून गणले गेले.

न्हावा ग्रामपंचायतीमध्ये सदस्य म्हणून निवडून आल्यानंतर आपल्या निर्भीड स्वभावाप्रमाणे कान्हाशेठ यांनी अनेक विकासकामे मार्गी लावली. उद्योगधंद्यात नावारूपाला आल्यावर अनेक गरजूंना त्यांनी उदार हस्ते मदत केली. देवभोळे असल्यामुळे अनेक धार्मिक कार्यांना, मंदिरांनाही त्यांनी मोठ्या प्रमाणात मदत केली. उद्योगधंद्यात कार्यरत असताना आपल्या न्हावेखाडी गावाकडे त्यांचे नेहमीच लक्ष असायचे.

कान्हाशेठ ठाकूर यांच्या पार्थिवावर न्हावेखाडी येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, पनवेलचे महापौर नितीन पाटील, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, कृष्णाशेठ ठाकूर, नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, नगरसेवक अजय बहिरा, प्रवीण पाटील, मधु पाटील, नरेंद्र ठाकूर, वासुदेव पाटील, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, उद्योगपती विजय जाधव कडू, वसंतशेठ पाटील, भाऊशेठ पाटील, सुनील म्हसकर, चेतन उर्फ भायाशेठ म्हात्रे, संजय पाटील, हरिश्चंद्र पाटील यांच्यासह अन्य मान्यवर, नातेवाईक, आप्तेष्ट आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कान्हाशेठ यांच्या पश्चात धर्मपत्नी देवकाबाई (बाय) ठाकूर, तीन मुले, एक मुलगी, जावई, सुना, नातवंडे आणि मोठा ठाकूर परिवार आहे. उद्योगव्यवसायात त्यांची मुले सागरशेठ ठाकूर, सम्राट ठाकूर, रोशन ठाकूर, जावई अल्केश बैकर वारसा चालवत आहेत. कान्हाशेठ यांच्या निधनाने ठाकूर कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून त्यांच्या आठवणींना उपस्थितांनी उजाळा देत श्रद्धांजली वाहिली.

## उष्माघातामुळे एकाचा मृत्यू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यातील रसायनी परिसरात कष्टकरीनगर येथे राहणाऱ्या एका व्यक्तीचा उष्माघातामुळे चक्कर येऊन मृत्यू झाल्याची घटना घडली. हिरामण किसन काळे (५५) असे मयत व्यक्तीचे नाव आहे.

कष्टकरीनगर येथील डोंगराच्या मध्यभागी असलेल्या मंदिराकडे हिरामण काळे पायवाटेने चालले होते. वाटेत उष्माघातामुळे चक्कर येऊन ते पडले. त्यांना चौक ग्रामीण रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

# विधान परिषद निवडणुकीतून जुईली महेंद्र दळवींची माघार

## महायुतीच्या अनिकेत तटकरेंचा मार्ग सुकर

**अलिबाग : प्रतिनिधी**



महाराष्ट्र विधान परिषदेच्या रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग (कोकण) स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीतून अपक्ष उमेदवार व आमदार महेंद्र दळवी यांच्या कन्या जुईली दळवी यांनी माघार घेतली आहे. त्यामुळे महायुतीचे उमेदवार अनिकेत तटकरे यांच्या विजयाचा मार्ग आता सुकर झाला आहे.

विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी कोकण मतदारसंघातून जुईली महेंद्र दळवी (अपक्ष), सुरेंद्रनाथ यशवंत माने (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे), अरविंद पुंडलिक म्हात्रे (शेकाप), ॲड. मानसी संतोष म्हात्रे (शेकाप), अनिल रमेश चोपडा (अपक्ष), अनिकेत सुनील तटकरे (राष्ट्रवादी काँग्रेस) अशा एकूण सहा उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. उमेदवारी अर्जांची मंगळवारी छाननी झाली. सर्व उमेदवारांचे अर्ज छाननीत वैध ठरले होते.

शिवसेनेचे अलिबागमधील आमदार महेंद्र दळवी यांची कन्या जुईली दळवी यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता, परंतु राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत महायुतीच्या नेत्यांची मंगळवारी बैठक झाली. त्यात कोकण मतदारसंघातून जुईली दळवी यांनी उमदेवारी अर्ज मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. उपमुख्यमंत्री शिंदेंनी उमेदवारी मागे घेण्याचे आदेश दिल्यामुळे आमदार दळवी यांच्या कन्या जुईली यांचा उमेदवारी अर्ज त्यांचे सूचक विघ्नेश माळी यांनी मागे घेतला.

जुईली दळवी यांनी निवडणुकीतून माघार घेतल्यामुळे महायुतीचे उमेदवार अनिकेत तटकरे यांच्या विजयाचा मार्ग सोपा झाला आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा गुरुवारी (दि. ४) शेवटचा दिवस आहे. उर्वरित उमेदवारांपैकी कोण आपला अर्ज मागे घेतो यावर लढतींचे अंतिम चित्र स्पष्ट होईल.

# शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी राजिपचा आरोग्य विभाग सज्ज

## ■ शिवभक्तांना पुरवणार विविध सुविधा




**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा ५ व ६ जूनदरम्यान किल्ले रायगड येथे साजरा होणार आहे. शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त रायगडावर हजारो शिवभक्त येत असतात. सध्या मोठ्या प्रमाणात उन्हाचा तडाखा जाणवत असल्याने नागरिकांना उष्माघात, चक्कर येणे, थकवा जाणवणे अशा आरोग्याच्या समस्या जाणवत आहेत. त्यामुळे रायगडावर येणाऱ्या शिवभक्तांच्या सोयीसाठी जिल्हा परिषदेंतर्गत आरोग्य विभागाने गडावर व पायथ्याशी विशेष वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका आणि मुबलक औषधसाठ्यासह सज्जता ठेवली आहे.

रायगड व परिसरात आरोग्य विभागाने वैद्यकीय पथके, गडावरील विविध पॉइंट्स आणि पाचाड येथील राजमाता जिजाऊ समाधी परिसराजवळ तात्पुरती वैद्यकीय मदत केंद्र उभारण्यात येणार आहेत. उन्हाचा त्रास, थकवा, चक्कर येणे, पाय घसरून होणाऱ्या किरकोळ दुखापती यावर औषधोपचार करण्यासाठी सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये जीवनरक्षक औषधे व लसी उपलब्ध ठेवण्यात आल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीत गडाच्या पायथ्याशी व परिसरातील प्रमुख मार्गांवर २४ तास कार्यरत असणाऱ्या रुग्णवाहिका तैनात करण्यात येणार आहेत. सोहळ्यादरम्यान निर्माण होणाऱ्या कोणत्याही आरोग्याच्या समस्येवर उपचारासाठी डॉक्टर, परिचारिका आणि पॅरामेडिकल स्टाफची नियुक्ती, सोबतच प्रत्येक कॅम्पच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोयही असणार आहे.

शिवराज्याभिषेकासाठी किल्ले रायगडावर येणाऱ्या शिवभक्तांची काळजी घेण्यासाठी जिल्हा परिषद कटिबद्ध असून तशी सज्जता आरोग्य विभागाने ठेवली आहे. त्यामुळे या सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मनीषा सातपुते, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांनी केले आहे. (पान २ वर..)



# ‘राज्यातील क्रीडांगणांवर स्वच्छतागृहे, चेंजिंग रूम, सीसीटीव्ही सुविधा अनिवार्य’

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील महिला खेळाडू विविध क्रीडा प्रकारांमध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. त्यांना अधिक सुरक्षित, सन्मानजनक आणि प्रोत्साहनपर वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील क्रीडांगणांच्या विकासासोबतच प्रत्येक क्रीडांगणावर मॉडेल स्वच्छतागृहे, पुरेशी प्रकाशयोजना, स्वतंत्र चेंजिंग रूम आणि सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याबाबत राज्यस्तरीय एकसंध धोरण तयार करण्यात यावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा क्रीडामंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले.



सन २०२६च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्यातील क्रीडांगणांवर महिला खेळाडूंसाठी स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत विचारण्यात आलेल्या तारांकित प्रश्नावरील आश्वासनाच्या अनुषंगाने सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार मिलिंद नार्वेकर, आमदार चित्रा वाघ, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल(दूरदृश्य प्रणालीद्वारे), क्रीडा व युवक सेवा विभागाचे आयुक्त दीपक सिंगला, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अविनाश ढाकणे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, राज्यातील महिला खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाच्या वतीने विविध योजना राबविण्यात येत आहेत. महिलांना सुरक्षित आणि सक्षम वातावरण मिळावे यासाठी आवश्यक त्या सुविधा व तरतुदी करण्यात येत आहेत. क्रीडा क्षेत्राला उभारी देण्यासाठी सक्षम पायाभूत सुविधा, दर्जेदार प्रशिक्षण व्यवस्था, आर्थिक पाठबळ, पोषण, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, सुरक्षित वातावरण आणि सामाजिक स्वीकार या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

त्या पुढे म्हणाल्या की, महाराष्ट्र शासनाने क्रीडा क्षेत्रात व्यापक सुधारणा करण्याचा निर्धार केला असून नव्या क्रीडा धोरणाद्वारे खेळाडूकेंद्रित दृष्टिकोन स्वीकारला आहे. ग्रामीण भागापासून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत खेळाडूंना संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. महिला खेळाडूंना क्रीडांगणांवर आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध झाल्यास त्यांच्या सहभागात आणि कामगिरीत अधिक सुधारणा होईल.

राज्यातील सर्व क्रीडांगणांवर महिला खेळाडूंसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यासाठी एकसूत्रता राखत संबंधित सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, तसेच याबाबत कृती आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देशही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी यावेळी दिले.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी घेतली डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारींची भेट

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा येथे राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे यांनी जेष्ठ निरूपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी व कुटूंबियांना सदिच्छा भेट दिली. यावेळी महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी, फलोत्पदान खार भुमि मंत्री व विधीमंडळ शिवसेना उपनेते भरतशेठ गोगावळे यांच्यासह अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांचीही उपस्थिती होती.



राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे यांचा खाजगी दौरा रेवदंडा येथे असल्याने व खाजगी दौरादरम्यान जेष्ठ निरूपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी व कुटूंबियांना सदिच्छा भेट देणार असल्याने सकाळ पासून रेवदंडा ते साळाव जेएसडब्लू कंपनी हॅलिपॅड येथे पर्यंत कडेकोट पोलिस बदोबस्त होता. ठिकठिकाणी पोलिसाचा अलर्ट बदोबस्त असल्याने स्थानिक ग्रामस्थ, पै-पाहूणे तसेच पर्यटक यांना कुतूहल होते, दरम्यान पोलिस बंदोबस्त राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे यांचा खाजगी दौरा असल्याची माहिती प्रत्येकाला मिळाली.

दुपारी एक ते दोन चे दरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे यांचे आगमन साळाव जेएसडब्लू येथील हॅलिपॅडवर झाले तेथून ते रेवदंडा येथील निरूपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांचे निवासस्थानी अनेक वाहनाच्या ताफयासह पोहचले. यावेळी जेष्ठ निरूपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी व कुटूंबियांनी त्याचे स्वागत केले.

दुपारी दोन ते सायकांळी पाच वाजेपर्यंत रेवदंडयातील डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी व कुटूंबिया समवेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सदिच्छा भेट झाली.





# जलसमुद्ध गाव म्हणून खालापूर तालुक्यातील खरीवली ग्रामपंचायतीचा सन्मान

**चौक : प्रतिनिधी**

संपूर्ण देशात जल समुद्‌ध गाव म्हणून खालापूर तालुक्यातील ग्राम पंचायत खरीवली यांना देशात प्रथम क्रमांक प्राप्त झाल्याने दिल्ली येथे राष्ट्रीय पंचायत पुरस्कार कार्यक्रमात केंद्रीय पंचायत राज मंत्री राजीव रंजन सिंह, पंचायत राज राज्य मंत्री एस पी सिंह वघेल यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले, रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, सरपंच सुंदर पवार,ग्राम पंचायत अधिकारी सौ. मनाली महेश म्हसे, उप सरपंच सुशांत विचारे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.खालापूर पंचायत समितीच्या मुकुटात आणखी एका पुरस्काराची नोंद झाली आहे.

शासनाच्या नाविन्य पूर्ण अभियानाचे रूपांतर गावच्या सर्वांगीण विकासात करण्यासाठी खालापूर पंचायत समिती गटविकास अधिकारी संदीप कराड हे रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत असून विस्तार अधिकारी, ग्राम पंचायत अधिकारी, सरपंच, सदस्य अहोरात्र मेहनत घेताना दिसत आहेत. खालापूर पंचायत समिती शासनाच्या नाविन्य पूर्ण अभियानात राज्यात प्रथम स्थानावर असून आता दिल्ली कडे गरुड झेप घेऊन जल समृद्‌ध गाव म्हणून खरीवली यांनी दिल्लीत पुरस्कार प्राप्त केला. खरीवली हे गाव निसर्ग संपन्न असून, या गावात पाण्याची वाणवा होती.

जलसमृद्‌ध या योजनेतून ग्राम पंचायत खरिवली यांनी काम करून देशात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. आज गाव जल समृद्‌ध गाव म्हणून ओळखले जात आहे.पाणी टंचाईवर मात करून शाश्वत पाणी व्यवस्थापन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. खरिवली ग्राम पंचायत यांनी जलसंधारण, विहिरींचे पुनर्भरण, शेततळे, नळजोडणी आणि पाण्याचा योग्य वापर यांद्‌वारे शेती व पिण्यासाठी मुबलक पाणी उपलब्ध केले आहे, ज्यामुळे गावाचा जल समृद्‌ध गाव म्हणून उल्लेख झाला.

जल समृद्‌ध गाव म्हणून काम करण्याची संधी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उप मुख्य कार्यकारी अधिकारी तनपुरे,गट विकास अधिकारी संदीप कराड, विस्तार अधिकारी यांचे मार्गदर्शन, योग्य सहकार्य मिळाल्याने हे यश प्राप्त झाले,असे ग्राम पंचायत अधिकारी मनाली महेश म्हसे यांनी भ्रमण ध्वनी वरून सांगितले. कार्यक्रमास पंचायत राज सचिव विवेक भारद्‌वाज, अप्पर सचिव सुशील कुमार सोहनी, रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, गट विकास अधिकारी संदीप कराड, विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल हे उपस्थित होते.



# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत महाराष्ट्र देशामध्ये टॉपर

**मुंबई : प्रतिनिधी**

छतावर सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवून घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य करण्याच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत दि. २९ मे रोजी देशात आतापर्यंतचे एका दिवसातील सर्वाधिक १५ हजार घरांवर प्रकल्प बसविण्यात आले असून त्यापैकी ४,७०० घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्राने प्रथम क्रमांक मिळविला. या यशाबद्दल केंद्रीय नवीकरणीय ऊर्जामंत्री प्रल्हाद जोशी यांनी महाराष्ट्राचे अभिनंदन केले असून राज्याने ६ लाखापेक्षा अधिक घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसविणाऱ्या निवडक राज्यांच्या गटात प्रवेश केल्याबद्दलही कौतुक केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्यात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीने वेग घेतला आहे. मे महिन्यात योजनेसाठी सादर अर्जांमध्ये देशात प्रथम क्रमांक, प्रकल्प बसविलेल्या एकूण घरांमध्ये दुसरा क्रमांक, प्रकल्पांच्या तपासणीमध्ये पहिला क्रमांक आणि पुरवठादारांच्या नोंदणीमध्ये दुसरा क्रमांक अशा रितीने या योजनेच्या बाबतीत महाराष्ट्र देशात सर्वोच्च कामगिरी करणाऱ्या पाच टॉपर राज्यांमध्ये समाविष्ट झाला आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची राज्यात महावितरणमार्फत अंमलबजावणी करण्यात येत आहे.. या यशाबद्दल राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनात सुरू करण्यात आलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घरगुती वीज ग्राहकांना घराच्या छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी थेट अनुदान मिळते. एक किलोवॅटच्या प्रकल्पासाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये व तीन किलोवॅटसाठी ७८ हजार रुपये अनुदान मिळते. या योजनेच्या अंमलबजावणीत वीज ग्राहकांकडून अर्जांची स्वीकृती, प्रत्यक्ष प्रकल्प बसविणे आणि त्याची तपासणी करून तो सुरू करणे हे तीन महत्त्वाचे टप्पे असतात. मे महिन्यात या योजनेसाठी देशभर विशेष अभियान चालविण्यात आले होते त्यामध्ये महाराष्ट्र राज्य टॉपर ठरले आहे.

योजनेसाठी मे महिन्यात प्राप्त झालेल्या अर्जांमध्ये ४ लाख ४९ हजार अर्जांसह महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. गुजरात (३ लाख), उत्तर प्रदेश (१ लाख), राजस्थान (४४ हजार) व केरळ (३५ हजार) या राज्यांचा महाराष्ट्रानंतर क्रमांक लागतो.

छतावर सौरऊर्जा प्रकल्प आस्थापित करण्यामध्ये महाराष्ट्र राज्य ५४ हजार प्रकल्पांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. याबाबतीत उत्तर प्रदेश (६४ हजार), गुजरात (३५ हजार), राजस्थान (२६ हजार) व केरळ (२० हजार) ही अन्य राज्ये टॉप पाच राज्यांमध्ये आहेत.

छतावर बसविलेले सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प तपासण्याच्या बाबतीही महाराष्ट्र राज्य ६९ हजार प्रकल्पांसह पहिल्या क्रमांकावर आहे. उत्तर प्रदेश (६४ हजार), गुजरात (४२ हजार), राजस्थान (२७ हजार) व केरळ (१८ हजार) ही राज्ये महाराष्ट्रानंतर टॉप पाचमध्ये समाविष्ट आहेत.

छतावर सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविण्याचे काम नोंदणीकृत कंत्राटदारांमार्फत केले जाते. ग्राहकाला आपल्या पसंतीप्रमाणे कंत्राटदार निवडता येतो. कंत्राटदारांच्या नोंदणीमध्ये ४१३ कंत्राटदारांसह महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. उत्तर प्रदेश (७७९), गुजरात (२१०), आसाम (१८१) ही सर्वोच्च कामगिरीपैकी अन्य राज्ये आहेत.

# निसर्गाच्या संकेताने शेतकरी बांधतो पावसाचा अंदाज

**खोपोली, मोहोपाडा : प्रातिनिधी**

आधुनिक तंत्रज्ञान, हवामान खात्याचे अंदाज आणि मोबाईलवरील विविध ॲप्स उपलब्ध असतानाही ग्रामीण भागातील अनेक शेतकरी आजही निसर्गातील घडामोडींवरून पावसाचा अंदाज बांधताना दिसून येतात. कावळ्याचे घरटे, मुंग्यांचे स्थलांतर, बिळाच्या तोंडाशी येणारे बेडूक आणि पक्ष्यांच्या हालचाली यावरून पावसाची चाहूल घेतली जाते.



ज्येष्ठ शेतकऱ्यांच्या मते, कावळा झाडाच्या उंच व सुरक्षित फांदीवर घरटे बांधत असेल तर त्या वर्षी पावसाचे प्रमाण अधिक राहण्याची शक्यता असते. तसेच मुंग्या मोठ्या प्रमाणात अन्नसाठा करताना किंवा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करताना दिसल्यास पाऊस जवळ आल्याचे संकेत मानले जातात.

पावसाळ्यापूर्वी बेडूक बिळातून बाहेर पडून बिळाच्या तोंडाशी दिसू लागतात. वातावरणातील आर्द्रता वाढल्यामुळे त्यांच्या हालचाली वाढतात, असे शेतकरी सांगतात. याशिवाय ढगांची दिशा, वाऱ्याचा वेग, पक्ष्यांचे थवे आणि कीटकांच्या हालचाली यांचाही अभ्यास करून पावसाचा अंदाज बांधला जातो.

ग्रामीण भागातील अनेक शेतकरी पेरणीचे नियोजन करताना अशा पारंपरिक संकेतांनाही महत्त्व देतात. आधुनिक हवामान अंदाजासोबतच पिढ्यान् पिढ्या चालत आलेले निसर्ग निरीक्षणाचे ज्ञान आजही शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरत असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.पावसाळा तोंडावर आला असताना शेतकरी आकाशाकडे नजर ठेवून आहेत.निसर्गातील या संकेतांमुळे पावसाच्या आगमनाबाबत उत्सुकता वाढली असून, शेतीच्या कामांना वेग देण्याची तयारी सुरू झाली आहे.

# जागतिक सायकल दिनानिमित्त माणगावात ‘सायकल कट्टा’ची स्थापना

**माणगाव : प्रतिनिधी**

आरोग्यदायी जीवनशैली, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक एकात्मता यांचा संदेश देणाऱ्या जागतिक सायकल दिनानिमित्त माणगावात सायकलप्रेमींसाठी एक अभिनव आणि प्रेरणादायी उपक्रम सुरू करण्यात आला आहे. "सायकल कट्टा" या नावाने स्थापन झालेला हा उपक्रम केवळ सायकलिंगपुरता मर्यादित नसून निरोगी जीवन, सकारात्मक विचार, पर्यावरण संरक्षण आणि मैत्रीची नाती अधिक दृढ करणारे व्यासपीठ ठरणार आहे.



या उपक्रमाचे नेतृत्व माणगावातील ज्येष्ठ नागरिक खेमचंद चुनीलाल तथा विजयभाई मेथा यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. विशेष म्हणजे, वयाच्या ७२ व्या वर्षीही ते नियमित सायकलिंग करून तरुणांसमोर आदर्श निर्माण करत आहेत. त्यांची ऊर्जा, शिस्त आणि आरोग्याबाबतची जागरूकता अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

आजच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनात अनेकजण शारीरिक हालचालींपासून दूर जात असल्याचे चित्र दिसून येते. वाढते प्रदूषण, जीवनशैलीजन्य आजार आणि मानसिक ताण या समस्यांवर सायकलिंग हा अत्यंत सोपा, किफायतशीर आणि प्रभावी उपाय मानला जातो. याच पार्श्वभूमीवर "सायकल कट्टा" हा उपक्रम नागरिकांना नियमित व्यायामाची सवय लावण्याबरोबरच पर्यावरणपूरक वाहतुकीकडे वळविण्याचा प्रयत्न करणार आहे.

या समूहामध्ये महिला, पुरुष, युवक, विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिक अशा सर्व वयोगटांतील नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या उपक्रमासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नसून प्रवेश पूर्णपणे विनामूल्य ठेवण्यात आला आहे. उपक्रमाच्या माध्यमातून नियमित सायकल राईड्स, आरोग्यविषयक जनजागृती, पर्यावरण संवर्धन मोहिमा तसेच सामाजिक बांधिलकी जपणारे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिल

नाव नोंदणी व संपर्क-विजय मेथा ८०८७५६२१३३ स्नेहल मेथा कुराडे८८८८३७३०३२ प्राची झेमस ९९७०८९८९८२.

पान १ वरुन

## शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी राजिपचा आरोग्य विभाग सज्ज

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत शिवराज्याभिषेक सोहळ्यादरम्यान दोन दिवस एकूण १३ विशेष वैद्यकीय पथके तयार करण्यात आली आहेत. यामध्ये प्रत्येकी एक वैद्यकीय अधिकारी, एक समुदाय आरोग्य अधिकारी व एक आरोग्यसेवक यांचा समावेश आहे. ही पथके कोंझर पार्किंग, वाय जंक्शन, चित्त दरवाजा, चित्त दरवाजा व महादरवाजा दोन्हींच्या मध्ये, महादरवाजा, वालसुरे पार्किंग, पाचाड धर्मशाळा, नाणे दरवाजा, शिवसृष्टी पार्किंग (पाचाड गाव), कवळीचा माळ, मदारी मेहतर ते महादरवाजाच्यामध्ये, प्राथमिक आरोग्य केंद्र पाचाड ओपीडी व राखीव पथक आरोग्यसेवा पुरविण्यासाठी तैनात करण्यात येणार आहेत.

# तळा तालुक्यातील दहावीच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार

**तळा : प्रतिनिधी**

शिक्षण विभाग व पं.स तळा यांचे माध्यमातून शालांत परीक्षा २०२६ च्या दहावीच्या परीक्षेत तालुक्यातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकांने यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार पंचायत समिती तळा येथे करण्यात आला आहे.

सदर प्रसंगी सभापती नथुराम मुकण, उपसभापती रविंद्र मांडवकर,पं.स सदस्या रूपाली तांडेल,गटविकास अधिकारी महादेव शिंदे, गटविकास अधिकारी गायकवाड, गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट,मुबीन वासकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर प्रसंगीप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेला सोहम नरेश सुर्वे, द्वितीय क्रमांक आलेली विनया पांडुरंग शिगवण, तृतीय क्रमांकांने उत्तीर्ण आरूषी अशोक चव्हाण यांचा व त्यांच्या पालकांचा सभापती नथुराम मुकण, उपसभापती रविंद्र मांडवकर व पं स सदस्या रूपाली तांडेल यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.



# म्यानमारच्या राष्ट्रपतींची जेएनपीएला भेट; बंदर विस्तार योजनांची घेतली माहिती

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीए)ला मंगळवारी (दि.२) म्यानमार प्रजासत्ताक संघराज्याचे राष्ट्रपती मिन आंग ह्लाइंग यांनी भेट दिली. यावेळी त्यांच्यासमवेत ६७ सदस्यीय अधिकृत शिष्टमंडळ उपस्थित होते. जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाल आणि विभागप्रमुखांनी शिष्टमंडळाचे स्वागत केले. भेटीदरम्यान शिष्टमंडळाला जेएनपीएच्या बंदर पायाभूत सुविधा, कार्यक्षमता, क्षमता विस्तार उपक्रम, धोरणात्मक विकास प्रकल्प, शाश्वतता उपाययोजना व भविष्यातील विकास आराखड्याबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले.



यावेळी भारतातील सर्वात मोठ्या खोल पाण्याच्या बंदरांपैकी एक म्हणून विकसित होत असलेल्या वाढवण बंदर प्रकल्पाची माहितीही देण्यात आली. हा प्रकल्प प्रादेशिक सागरी व्यापार वृद्धीस चालना देणारा आणि देशाच्या सागरी क्षेत्रातील महत्त्वाचा विकास टप्पा मानला जात आहे. राष्ट्रपती मिन आंग ह्लाइंग यांनी जेएनपीएने भारतातील क्रमांक एकचे बंदर म्हणून मिळवलेले स्थान हे त्याच्या उत्कृष्ट कार्यक्षमतेचे आणि सक्षम सेवा क्षमतेचे प्रतीक असल्याचे नमूद केले. म्यानमारमध्येही बंदर विकास उपक्रमांना गती देण्याची इच्छा व्यक्त करीत जेएनपीएच्या अनुभवातून शिकणे आणि ज्ञानविनिमय व परस्पर सहकार्याच्या संधींचा आढावा घेणे याबाबत शिष्टमंडळ उत्सुक असल्याचे त्यांनी सांगितले.

जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाल म्हणाले, "म्यानमारचे राष्ट्रपती मिन आंग ह्लाइंग आणि शिष्टमंडळाचे स्वागत करण्याचा आम्हाला सन्मान लाभला. या भेटीमुळे भारताच्या सागरी क्षेत्रातील क्षमता, जेएनपीएची कार्यक्षमता तसेच वाढवण बंदर प्रकल्पासह विकास उपक्रम सादर करण्याची संधी मिळाली. भारत आणि म्यानमार यांच्यातील सागरी व व्यापारविषयक सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी तसेच प्रादेशिक संपर्क, आर्थिक विकास आणि परस्पर प्रगतीस चालना देणाऱ्या नव्या शक्यतांचा वेध घेण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत."

शिष्टमंडळाने बंदर परिसराला भेट देऊन कामकाज पद्धती, माल हाताळणी प्रक्रिया व एकात्मिक लॉजिस्टिक्स परिसंस्थेची पाहणी केली. या भेटीतून जेएनपीएच्या जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा व आंतरराष्ट्रीय व्यापारातील महत्त्वपूर्ण योगदानाचे दर्शन घडले. व्यापार, संपर्कक्षमता आणि शाश्वत आर्थिक विकासाला गती देण्यासाठी इंडो-पॅसिफिक क्षेत्रात सागरी सहकार्य आणि प्रादेशिक भागीदारीची भूमिका बळकट होत असल्याचे यातून अधोरेखित झाले.

# जेएनपीटी पोर्ट रोडवर ऑइलचा टँकर उलटला

**उरण : बातमीदार**

जेएनपीटी पोर्टकडे जाणाऱ्या वर्दळीच्या मार्गावर पीयूपी बिल्डिंग परिसरात बुधवारी (दि. ३) सकाळी १०.४० वाजता तेलाने भरलेला ऑइल टँकर पलटी झाला. अपघातात हजारो लिटर तेल रस्त्यावर सांडल्याने वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. रस्ता निसरडा होऊन दुसऱ्या दुर्घटनेचा धोका निर्माण झाला होता. सुदैवाने जीवितहानी टळली. घटनास्थळाजवळ इंडियन कस्टमचे कार्यालय असून हा मार्ग पोर्टसाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याने अपघातानंतर वाहनांच्या लांब रांगा लागल्या होत्या.



प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन वाहतूक नियंत्रित केली, मात्र तोपर्यंत मोठे आर्थिक व पर्यावरणीय नुकसान झाले. जेएनपीटी पोर्ट रोडवर गेल्या काही महिन्यांपासून अपघातांची मालिका सुरू आहे. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र हजारो लिटर तेल वाया गेल्याने आर्थिक नुकसान झाले असून तेल रस्त्यावर व गटारात मिसळल्याने पर्यावरणीय धोकाही निर्माण झाला. नागरिकांनी या मार्गावर तातडीने सुरक्षा उपाययोजना राबविण्याची मागणी केली आहे. अवजड वाहनांवर नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन अधिक प्रभावी करणे, वेगमर्यादा पाळण्यास भाग पाडणे, अपघातप्रवण ठिकाणांची तपासणी करून गतिरोधक, सूचना फलक यांसारख्या उपाययोजना करण्याची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# जेएनपीए ते मुंबई जलमार्गात बदल; भाऊच्या धक्क्यावरून बोट धावणार

**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीए बंदरातून मुंबई गेट वे ऑफ इंडिया अशी जलवाहतूक सुरू असते, मात्र पावसाळ्यात खवळणाऱ्या समुद्रापासून सावधानता म्हणून या जलमार्गात बदल करण्यात आला आहे. या मार्गावरील प्रवासी बोटी गेट वे ऑफ इंडियाऐवजी भाऊचा धक्का येथून ये-जा करणार असल्याची माहिती जेएनपीए जलवाहतूक विभागाने दिली आहे.

जेएनपीए बंदर ते मुंबई अशी जलवाहतूक सेवा गेल्या ३७ वर्षांपासून सुरू आहे. पावसाळ्यात वादळी वारे, समुद्रात उसळणाऱ्या महाकाय लाटा यामुळे गेट वे ऑफ इंडियापर्यंत प्रवासी बोटींना प्रवास करणे धोक्याचे ठरते. त्यामुळे गेट वे ते अलिबाग, त्याचप्रमाणे गेट वे ते घारापुरी (एलिफंटा) येथील जलसेवाही बंद करण्यात येते, मात्र उरणच्या मोरा ते मुंबई या जलमार्गावरील वाहतूक बारमाही सुरू असते. त्याचप्रमाणे जेएनपीए ते मुंबई ही जलवाहतूकही सुरू ठेवण्यात येते, मात्र पावसाळ्यात या सेवेच्या मार्गात बदल केला जातो.

जेएनपीए ते मुंबई जलमार्गात पावसाळ्यात समुद्राच्या भरतीमुळे समुद्रात चार ते पाच मीटर उंचीच्या लाटा उसळतात. या काळात गेट वे ऑफ इंडिया येथील लाटांचा प्रवासी बोटींना धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने या परिसरातील बोटी बंद करण्यात येतात. यावेळी जेएनपीए ते गेट वे ऑफ इंडियाऐवजी ही सेवा जेएनपीए ते भाऊचा धक्का अशी सुरू करण्यात येते.

**असा घ्या सेवेचा लाभ**

जेएनपीए लँडिंग जेट्टीवरून प्रवासी वाहतूक सेवा सुरू असते. त्यासाठी जेएनपीए कामगार वसाहतीमधून बससेवा आहे. दर तासाने मुंबईसाठी बोट सुटत असल्याने ही सेवा थेट जेट्टीपर्यंत आहे. या जलमार्गाने जेएनपीए बंदरातील कामगार, कर्मचारी तसेच त्यांचे कुटुंबीय यांच्यासाठी ही सेवा अत्यल्प शुल्कात आहे, तर बंदरावर आधारित उद्योगात काम करणाऱ्या अधिकारी, कामगार, कर्मचारी आणि व्यावसायिकांना या सेवेचा लाभ घेता येतो. वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून अनेक ठिकाणी उड्डाणपूल व पर्यायी मार्गांची उभारणी केली जाते, मात्र तरीही अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो, मात्र जेएनपीए ते मुंबई हा एक तासाचा प्रवास विनाअडथळा आणि प्रदूषणमुक्त प्रवास मानला जातो.

# हायप्रोफाईल वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश; तरुणीची सुटका

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलिसांनी करंजाडे भागातील एका फ्लॅटवर छापा टाकून वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी २० वर्षीय तरुणीची सुटका केली असून वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या ३३ वर्षीय महिलेला ताब्यात घेतले आहे. गेल्या काही महिन्यांपासून या महिलेने पीडित तरुणीच्या मदतीने सदर फ्लॅटमध्ये वेश्याव्यवसाय चालवल्याचे तपासात आढळले आहे.

करंजाडे परिसरातील एका इमारतीत वेश्याव्यवसाय सुरू असल्याची गोपनीय माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पथकाने गणेश पार्क इमारतीमधील रूम नंबर १०३ मध्ये बनावट ग्राहक पाठवून खात्री केली. आरोपी महिलेने बनावट ग्राहकाकडून वेश्यागमनाचे ३ हजार रुपये स्वीकारून २० वर्षीय पीडित तरुणीला पाठवले. बनावट ग्राहकाने इशारा देताच पोलिसांनी फ्लॅटवर छापा टाकला. पीडित तरुणीची सुटका करून वेश्याव्यवसाय करवून घेणाऱ्या महिलेला ताब्यात घेण्यात आले आहे.

# यूईएस कॉलेजच्या टीवायबीएससी आयटीचा ७२ टक्के निकाल

उरण : वार्ताहर

यूईएस कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजीच्या टीवायबीएससी आयटी २०२५-२६चा ७२ टक्के निकाल लागला आहे. या परीक्षेत नेरेकर जोया फरहान सना हिने सीजीपीए ९.८५ मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. केरलकर आयशा हारुन नदीरा हिने सीजीपीए ९.७० मिळवून द्वितीय तर गावंड तन्वी रवींद्र अनिता हिने सीजीपीए ९.५५ मिळवून तृतीय क्रमांक मिळवला.




यंदाचा टीवायबीएससी आयटीचा निकाल संख्यात्मकच नव्हे तर गुणात्मक व उल्लेखनीय आहे. यशस्वी विद्यार्थ्यांवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. या यशाबद्दल विद्यार्थी, त्यांचे आईवडील, यूईएसचे कमिटी मेंबर्स, सीनियर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या आणि विभागप्रमुख यांच्याकडून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे तसेच मेहनत घेणाऱ्या सर्व शिक्षकांचे कौतुक करण्यात येत आहे.

# नवीन पनवेलमध्ये अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल भागात राहणाऱ्या एका तरुणाने अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याने पीडित मुलगी गरोदर राहिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पीडितेला तपासणीसाठी रुग्णालयात नेल्यानंतर हा प्रकार उघड झाला. नेरुळ पोलिसांनी पीडितेवर अत्याचार करणाऱ्या तरुणाविरोधात गुन्हा दाखल करून तपासासाठी खांदेश्वर पोलिसांकडे वर्ग केला आहे.

पीडित मुलगी व आरोपी तरुण एकमेकांच्या ओळखीचे आहेत. याचा गैरफायदा घेत तरुणाने मुलीला प्रेमात पाडून जवळीक साधली. एप्रिल महिन्यात पीडित मुलगी घरात एकटी असल्याचा फायदा घेत त्याने बळजबरीने शरीरसंबंध ठेवले. त्यामुळे पीडित मुलगी गरोदर राहिली. पोटात दुखू लागल्याने आईने तिला नेरुळ येथील महापालिकेच्या मीनाताई ठाकरे रुग्णालयात नेले असता तपासणीत ती गरोदर असल्याचे समोर आले.

डॉक्टरांनी नेरुळ पोलिसांना माहिती दिल्यानंतर पीडितेच्या आईच्या तक्रारीवरून तरुणाविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. घटनास्थळ खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असल्याने गुन्हा या पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे.

# चोरीला गेलेल्या रिक्षाचा शोध

**पनवेल : वार्ताहर**

कोपरा खारघर येथून चोरीला गेलेली रिक्षा अवघ्या तीन दिवसांत शोधण्यात खारघर पोलिसांना यश आले. रिक्षा क्रमांक एमएच ४६ एझेड ५२९९ पोलिसांनी हस्तगत करून मालक व चालक राकेश बाळाराम कामोठेकर यांच्या ताब्यात दिली. चोरीची घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली होती. फुटेजमध्ये पहाटे ३ वाजता एक व्यक्ती रिक्षा घेऊन जाताना दिसला. या धाग्यांच्या आधारे पोलिसांनी तांत्रिक तपास व खबऱ्यांच्या मदतीने रिक्षाचा माग काढला.

रिक्षा परत मिळाल्याने समाधान व्यक्त करताना राकेश कामोठेकर यांनी पोलिसांच्या कारवाईचे कौतुक केले. दिलासा मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. चोरी करणाऱ्या संशयिताची ओळख सीसीटीव्हीच्या आधारे पटली. त्याच्या अटकेसाठी शोधमोहीम सुरू आहे. खारघर परिसरात वाहनचोरीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर या कारवाईला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

# ओरायन मॉलमध्ये रविवारी रक्तदान शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

दरवर्षी उन्हाळ्यात रक्ताचा तीव्र तुटवडा जाणवतो. त्यामुळे सरकारनेही रक्तदान शिबिरे आयोजित करण्याचे आवाहन केले आहे. याला प्रतिसाद देत KDAGB ग्रुप आणि ओरायन मॉल गेल्या दोन वर्षांपासून संयुक्तपणे रक्तदान शिबिरे घेत आहेत. यंदा रविवारी (दि. ७) सकाळी १० ते सायंकाळी ७ या वेळेत ओरायन मॉल येथे तिसऱ्या वर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

ओरायन मॉलचे संचालक मंगेश परुळेकर यांनी पनवेलकरांना आवाहन केले की, "पनवेल हे महामार्गावर वसलेले शहर आहे. पनवेलच्या चारही बाजूंनी महामार्ग असून अपघातग्रस्तांना तसेच ग्रामीण भागातील गरीब महिला व मुलांना सतत रक्ताची गरज भासते. रक्ताचा नेहमीच तुटवडा जाणवतो. एमजीएम हॉस्पिटल कळंबोली महामार्गावर असल्याने बहुतेक अपघातग्रस्त रुग्ण तिथे दाखल होतात. त्यांना मदत व्हावी म्हणून एमजीएमच्या सहकार्याने तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली हे शिबिर होणार आहे. पनवेलकरांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही प्रतिसाद द्यावा." यंदा आयडब्ल्यूसी गॅलॅक्सी न्यू पनवेल सहप्रायोजक आहेत.

# आकुर्लीत अल्पवयीन मुलीसोबत गैरवर्तन

**नवीन पनवेल :** सात वर्षीय मुलीसोबत गैरवर्तन केल्याप्रकरणी सुमेध नंदकिशोर घोक्षे (आकुर्ली) याच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात २ जून रोजी पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. पीडित मुलगी ३० मे रोजी सायंकाळी ६च्या सुमारास इमारतीखाली खेळत असताना आरोपीने लपाछपी खेळण्याच्या बहाण्याने तिचा हात पकडला आणि तिच्यासोबत गैरवर्तन केले.

## वेश्या व्यवसायप्रकरणी महिलेवर गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** २० वर्षीय मुलीला वेश्या व्यवसायासाठी भाग पाडल्याप्रकरणी वरचा ओवळा येथील महिलेविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात १ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. वरचा ओवळा येथील आरोपी महिलेने २० वर्षीय पीडित मुलीला प्रलोभन दाखवून वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर पनवेल शहर पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवला. आरोपीने बनावट ग्राहकाला पीडित मुलगी दाखवून अनैतिक शारीरिक संबंधासाठी तीन हजार रुपये स्वीकारले.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**नवीन पनवेल :** १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिला गर्भवती केल्याप्रकरणी मंगेश पवारविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात २ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. पीडित मुलगी घरी एकटी असताना एप्रिलमध्ये आरोपीने खेळण्याच्या बहाण्याने तिच्यावर अत्याचार केला.

# पिकअपची ट्रेलरला धडक; चालकाचा मृत्यू

**पनवेल :** पिकअपने पुढे जाणाऱ्या ट्रेलरला धडक दिल्याने झालेल्या अपघातात चालक जयपाल खोपटकर (रा. दिघी, श्रीवर्धन) यांचा मृत्यू झाला, तर चौघेजण जखमी झाले. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात २ जून रोजी करण्यात आली.

२ जूनला मध्यरात्री १२ च्या सुमारास डोंबाळा कॉलेज, पनवेलसमोरील ब्रिजवर पळस्पे ते जेएनपीटीकडे जाणाऱ्या मार्गिकेवर पिकअप क्रमांक एमएच ०६ बीडब्ल्यू ६१०१च्या चालकाने भरधाव वेगाने वाहन चालवून पुढे जाणाऱ्या ट्रेलर क्रमांक एमएच १६ सीसी २९७९ला पाठीमागून जोरात धडक दिली. या अपघातात चालक जयपाल हाश्या खोपटकर गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला. पिकअपमधील कृष्णा लक्ष्मण चिकाटी, काशिनाथ भानगोजी, कमलाकर लक्ष्मण चिकाटी आणि अविनाश रामदास गुंड हे चौघे गंभीर जखमी झाले. पनवेल शहर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# सय्यद अकबर भाजप अल्पसंख्याक मोर्चा कोकण विभाग सहसंयोजकपदी

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या अल्पसंख्याक मोर्चाच्या माध्यमातून जनसंपर्क, जनसेवेचे कार्य करणाऱ्या पनवेल येथील सय्यद अकबर यांच्या सक्षम खांद्यावर पक्ष नेतृत्वाने अल्पसंख्याक मोर्चाच्या कोकण विभाग सहसंयोजक म्हणून जबाबदारी दिली आहे. येत्या ५ ते ३० जूनदरम्यान होणाऱ्या विविध मंडळ स्तरीय कार्यक्रमांची काटेकोर नियोजन यंत्रणा उभारणे आणि त्या कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करण्याच्या अनुषंगाने सय्यद अकबर यांची नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे.



पक्ष संघटन, निवडणुका नियोजन आणि योजना अंमलबजावणी यांचा प्रचंड दांडगा अनुभव असणाऱ्या सय्यद अकबर यांची अल्पसंख्याक मोर्चाच्या कोकण विभाग सहसंयोजकपदी नियुक्ती झाल्याने कार्यकर्त्यांत आनंदाचे वातावरण पाहायला मिळते.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने आगामी सुमारे महिन्याभराच्या कालावधीमध्ये जनसंपर्क, स्वास्थ्य संवर्धन आणि पर्यावरण रक्षण या तीन महत्त्वपूर्ण आघाड्यांवर जनता केंद्रित कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांची आखणी, छोट्यातल्या छोट्या गोष्टीचे नियोजन आणि प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या दिवशी सुरळीत आयोजन करणे याकामी मंडळ स्तरावर सक्षम शिलेदार निवडण्याची जबाबदारीदेखील सय्यद अकबर यांच्यावर पक्ष नेतृत्वाने सोपवली आहे.

भाजपच्या वतीने ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये वृक्षारोपण अभियान तसेच "एक पेड माँ के नाम" अभियान, देशाला अत्यंत गरज असणारी अशी इंधन बचतीचा संदेश देण्यासाठी सायकल व दुचाकी रॅली, स्वच्छता तसेच प्लास्टिकमुक्त अभियान, जलसंरक्षण जागरूकता अभियान, वृक्षवाटप, प्रसिद्धिमाध्यमांशी संवाद आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या लोकाभिमुख कार्यक्रमांमध्ये विद्यार्थी आणि युवा वर्गाला सहभागी करून घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

यंदाच्या वर्षी कोकण प्रांतामध्ये योग दिवस आयोजित करून त्याचे अनुषंगाने जनसंपर्क वाढवण्याचे कार्य सय्यद अकबर यांच्या मार्गदर्शनाखाली हाती घेण्यात आले. या नियुक्तीबाबत विचारले असता सय्यद अकबर म्हणाले की, हे पद म्हणजे मी करत असलेल्या निस्सिम कार्याची पावती आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेला गुरुमंत्र म्हणजे सबका साथ! सबका विकास! हा गुरुमंत्र मी माझ्या हृदयावर आणि मेंदूमध्ये कोरला आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर आणि अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुल्तानी यांच्या उत्तम मार्गदर्शनाखाली मी नेहमीच कार्यरत असतो. जनता केंद्रित कार्यक्रम मी समाजातील अखेरच्या घटकापर्यंत घेऊन जाईन, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# खारघरमध्ये सिडकोची कारवाई; अनधिकृत आरसीसी बांधकाम निष्कासित

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडकोच्या नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (न.मुं) विभागामार्फत बुधवारी (दि. ३) खारघर नोड येथे निष्कासन मोहीम राबवण्यात आली. यात सेक्टर ६ येथील उत्सव चौक परिसरात अनधिकृतपणे बांधण्यात येत असलेले एक मजल्याचे आरसीसी बांधकाम निष्कासित करण्यात आले. सदर बांधकाम सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करून तसेच महामंडळाकडून कोणत्याही प्रकारची अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आले होते.



मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार आणि मुख्य नियंत्रक विशाल ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर नोडचे नियंत्रक, अनधिकृत बांधकामे श्रीकांत पावसकर यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. नियंत्रक अनधिकृत बांधकामे (न.मुं.) विभागाचे अधिकारी, कर्मचारी, स्थानिक पोलीस, सिडको पोलीस पथक, सिडकोचे सुरक्षा रक्षक आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान यांच्या सहभागाने ही कारवाई राबवण्यात आली.


## संपादकीय

# भारतीयांविरोधात रोष?

विदेशी पर्यटनात भारतीयांची संख्या अलीकडे बरीच वाढली आहे. यातील काही भारतीय पर्यटक बेशिस्त वर्तन करतात आणि त्यातून सगळ्याच भारतीय पर्यटकांविषयी नकारात्मक प्रतिमा तयार होते असे दिसते. काही विशिष्ट देशांत भारतीयांविरोधातील रोषात यामुळे भर पडत असल्याने भारतीय पर्यटकांच्या या चुकीच्या प्रतिमेबद्दल सध्या सर्व स्तरांवर चिंता व्यक्त होत आहे.

**भारतीय पर्यटक परदेश प्रवासात, विमानात, विमानतळांवर, इमिग्रेशनचे सोपस्कार पार पाडताना बेशिस्तपणे वागतात. रांगांची शिस्त पाळत नाहीत. हॉटेलांमध्ये आरडाओरडा करणे, टॉवेल, साबण अशा किरकोळ वस्तूंच्या चोऱ्या करणे, पर्यटनस्थळी वाट्टेल तिथे उभे राहून फोटो, व्हिडिओ काढणे, नाचणे, हुल्लड माजवणे अशा स्वरूपाचे गैरवर्तन आपल्या पर्यटकांकडून दिसते अशी चर्चा गेले काही दिवस मोठ्या प्रमाणात सुरू आहे. व्हिएतनामच्या विमानतळाच्या धावपट्टीजवळ काही पर्यटकांनी गरबा केल्याचा एक व्हिडिओ अलीकडे व्हायरल झाला आणि भारतीय पर्यटकांच्या परदेशांतील बेशिस्त वर्तनाविरोधातली ही चर्चा सुरू झाली. विमानतळावरील भाग सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील असताना संबंधित पर्यटकांनी तिथे गरबा करण्याचे आक्षेपार्ह वर्तन केले. बेशिस्त वर्तनाबद्दल भारतीय पर्यटकांवर जागतिक स्तरावर बराच काळ टीका होत आली आहे. सध्या काही ठिकाणी तर भारतीय पर्यटकांसाठी विशेष सुचनावली लावलेल्या दिसतात. बुफेमधील जेवण बांधून रूममध्ये नेणे, हॉटेलातील कॉरिडोअरमध्ये शांतता न राखणे अशा स्वरुपाच्या भारतीय पर्यटकांच्या वर्तनाविरोधात स्वित्झर्लंडमधील एका बड्या हॉटेलात काही वर्षांपूर्वी नोटीस लावण्यात आली होती. या अशा वर्तनाचे पुरावे असलेले व्हिडिओच अलीकडच्या काळात व्हायरल झाल्याने यासंदर्भात मोठी टीका होते आहे. परदेशांतील सार्वजनिक ठिकाणी हुल्लडबाजी करणाऱ्या भारतीय पर्यटकांकडून देशाची बदनामी होत असल्यामुळे अशा पर्यटकांवर काही वर्षांसाठी परदेश प्रवासास बंदी घालावी अशी मागणी आयपीएस अधिकारी अरुण बोथरा यांनी केली. देशाची प्रतिमा डागाळणाऱ्या अशा लोकांविरोधात कठोर कारवाई झाली पाहिजे अशी आक्रमक भूमिका त्यांनी घेतली. भारतीय पासपोर्ट असणे हा केवळ एक हक्क नाही तर त्यासोबत एक मोठी जबाबदारीही नागरिकांवर येते. आपण ज्या देशात जातो, तिथल्या स्थानिक कायद्यांचा आदर करणे, सार्वजनिक ठिकाणी योग्य वर्तन ठेवणे आणि आपल्या देशाच्या प्रतिमेचे रक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. परंतु अनेकदा भारतीय पर्यटक थेट विमानप्रवासापासूनच बेशिस्त वर्तनाची सुरूवात करतात. कुठल्याही रेस्टॉरंटमध्ये गरबा सुरू केला जातो वा मोठ्याने पंजाबी गाणी लावून परिसर डोक्यावर घेतला जातो. या अशा वर्तनाचे व्हिडिओ व्हायरल झाल्याने भारतीय पर्यटकांना 'सिव्हिक सेन्स' शिकवण्याची गरज आहे अशी चर्चा सध्या सुरू आहे. मोजक्याच दिवसांसाठी परदेशांत जाऊन आपण संपूर्ण भारतीय समाजाची चुकीची प्रतिमा निर्माण करतो. नोकरी–व्यवसायानिमित्त परदेशांत कायमस्वरूपी वास्तव्य करून असणाऱ्या अनिवासी भारतीयांना याची किंमत चुकवावी लागते. काही ठिकाणी त्यांना मुळातच वर्णद्वेषाचा सामना काही प्रमाणात करावाच लागत असतो. त्यात भारतीय पर्यटकांच्या नकारात्मक प्रतिमेमुळे अनिवासी भारतीयांवरही अकारण बेशिस्तीचा ठपका ठेवला जाऊ शकतो. महत्प्रयासाने ही मंडळी तिथे स्वतःची चांगली प्रतिमा निर्माण करत असतात. कुणा पर्यटकांच्या गैरवर्तनामुळे त्यांच्या या प्रयत्नांवर पाणी फेरले जाणार नाही याची काळजी आपण नक्कीच घेतली पाहिजे. अर्थात भारतीयांविरोधात रोष वाढण्यामागे अमेरिकेसारख्या काही देशांमधील आर्थिक मंदी व स्थानिकांची बेरोजगारी ही कारणेही आहेतच.**

# भारताची जागतिक स्तरावर गरुडझेप






आज भारत जागतिक पटलावर एक सशक्त, आत्मविश्वासपूर्ण आणि निर्णायक देश म्हणून उदयास येत आहे. गेल्या एका दशकात देशाने आर्थिक, तांत्रिक, संरक्षण, मुत्सद्देगिरी आणि सांस्कृतिक क्षेत्रात केलेली प्रगती जगाचे लक्ष वेधून घेणारी आहे. या प्रगतीमागे स्पष्ट धोरण, दृढ नेतृत्व आणि १४० कोटी भारतीयांची मेहनत यांचा मोठा वाटा आहे. वर्तमान केंद्र सरकारच्या काळात 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास' या मंत्रावर देशाची वाटचाल सुरू आहे. २०१४ नंतर भारताने आर्थिक सुधारणांना गती दिली.

'भारत बनवूया', 'नवउद्यम भारत', 'अंकाधारित भारत' यांसारख्या उपक्रमांमुळे देशात उद्योगस्नेही वातावरण निर्माण झाले. आज भारत जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे आणि लवकरच तिसऱ्या क्रमांकावर पोहचण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. वस्तू व सेवाकर या कर सुधारणेमुळे 'एक देश, एक कर' ही संकल्पना प्रत्यक्षात आली. एकत्रित देयक जोडणीमुळे अंकाधारित देयकांमध्ये भारताला जगात अग्रेसर केले. आज जगातील ४६ टक्के तत्काळ अंकाधारित व्यवहार एकट्या भारतात होतात. साथरोग काळातही भारतीय अर्थव्यवस्थेने लवचिकता दाखवली आणि जगातील सर्वात वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था म्हणून नाव कमावले. नवीन कामगार कायदे, दिवाळखोरी संहिता, उत्पादनावर आधारित प्रोत्साहन योजना यामुळे गुंतवणुकीला चालना मिळाली. परकीय गुंतवणुकीचा ओघ विक्रमी पातळीवर पोहचला. 'आत्मनिर्भर भारत' मोहिमेमुळे संरक्षण उत्पादनात देश स्वयंपूर्ण होत आहे. तेजस लढाऊ विमान, आयएनएस विक्रांत ही स्वदेशी विमानवाहू नौका, ब्रह्मोस क्षेपणास्त्र यांसारख्या यशामुळे भारत संरक्षण आयातीऐवजी निर्यातीकडे वळला आहे.

आज ८५हून अधिक देशांना भारत संरक्षण सामग्री निर्यात करतो. सीमेवर पायाभूत सुविधा मजबूत करणे, सैनिकांना आधुनिक शस्त्रे देणे आणि 'एक श्रेणी एक निवृत्तिवेतन' सारखे निर्णय यामुळे सैन्याचे मनोबल उंचावले आहे. संरक्षण संशोधन संस्थेने क्षेपणास्त्र, उड्डाण यंत्र, रडार यांसारख्या क्षेत्रात स्वदेशी तंत्रज्ञान विकसित केले. सीमा रस्ते संघटनेने अतिदुर्गम भागात रस्ते, पूल, बोगदे बांधून सैन्याची हालचाल सुलभ केली. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या यशाने संपूर्ण जगाला थक्क केले आहे. चांद्रयान–३ मोहिमेत भारताने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी उतरणारा पहिला देश होण्याचा मान मिळवला. आदित्य–१, गगनयान मोहिमेमुळे भारत अंतराळ महासत्ता म्हणून ओळखला जात आहे. त्याचबरोबर सूक्ष्मतोडपट्टी मोहीम, कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण, पाचव्या पिढीची संपर्कसेवा यामुळे भारत 'तंत्रज्ञान केंद्र' बनत आहे. जगातील मोठमोठ्या कंपन्या आज भारतात संशोधन व विकास केंद्रे उभारत आहेत. अंकाधारित पायाभूत सुविधा, सार्वजनिक अंकाधारित सेवा यामुळे सामान्य माणसाचे जीवन सुलभ झाले आहे. २० देशांच्या गटाचे अध्यक्षपद भारताने अत्यंत यशस्वीपणे सांभाळले. 'वसुधैव कुटुंबकम' या संकल्पनेवर आधारित दिल्ली घोषणापत्रावर सर्व देशांचे एकमत घडवून आणणे हे मोठे मुत्सद्देगिरीचे यश मानले गेले. 'जागतिक दक्षिणेचा आवाज' शिखर परिषदेतून भारताने विकसनशील देशांचा आवाज बनण्याची भूमिका घेतली. चौकडी, आयटूयूटू, ब्रिक्स यांसारख्या व्यासपीठांवर भारताची भूमिका निर्णायक ठरत आहे. योगाला आंतरराष्ट्रीय दिवस मिळवून देणे, आंतरराष्ट्रीय सौर आघाडीची स्थापना करणे यातून भारताचे 'मृदू सामर्थ्य' वाढले आहे. शेजारी प्रथम धोरण, पूर्वेकडे पाहा धोरण, सागरी क्षेत्रात सुरक्षा व वाढ या संकल्पनांमुळे भारताची विश्वासार्हता वाढली. परदेशात अडकलेल्या भारतीयांना परत आणण्यासाठी चालवलेल्या मोहिमा यशस्वी झाल्या.

गेल्या १० वर्षांत देशात रस्ते, रेल्वे, बंदरे, विमानतळ यांच्या जाळ्यात अभूतपूर्व वाढ झाली आहे. दररोज ३७ किलोमीटर महामार्गाचे निर्माण, वंदे भारतसारख्या अर्ध–वेगवान गाड्या, ७५हून अधिक नवीन विमानतळ, 'भारतमाला', 'सागरमाला' प्रकल्प यामुळे जोडणी वाढली. १०० टक्के गावांचे विद्युतीकरण, 'घरोघरी नळातून पाणी' योजनेतून नळाने पाणी, ११ कोटींहून अधिक शौचालये बांधून स्वच्छ भारत मोहीम यशस्वी करणे ही मोठी कामगिरी आहे. समर्पित मालवाहू रेल्वेमार्ग, मल्टीमॉडल लॉजिस्टिक्स पार्क, पंतप्रधान गतीशक्ती राष्ट्रीय आराखडा यामुळे वाहतूक खर्च कमी होत आहे. जनधन योजनेतून ५० कोटींहून अधिक बँक खाती उघडली गेली. थेट लाभ हस्तांतरणामुळे ३४ लाख कोटी रुपये थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झाले आणि मधली दलाली संपली. उज्ज्वला योजनेतून १० कोटींहून अधिक मोफत वायू जोडण्या, आयुष्मान भारतमधून ५० कोटी लोकांना ५ लाखांपर्यंत मोफत उपचार, पंतप्रधान आवासमधून ४ कोटींहून अधिक घरे यामुळे सामान्य माणसाच्या जीवनात प्रत्यक्ष बदल झाला. साथरोग काळात ८० कोटी लोकांना मोफत धान्य देणारी 'पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजना' जगातील सर्वात मोठी अन्न सुरक्षा योजना ठरली. शेतकरी सन्मान निधीतून ११ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना थेट मदत मिळाली. पीक विमा योजना, ई–नाम बाजार, शेतमाल साठवणूक पायाभूत सुविधा यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढत आहे. काशी विश्वनाथ दालन, महाकाल लोक, अयोध्या श्रीराम मंदिर निर्माण, केदारनाथ पुनर्विकास यांसारख्या प्रकल्पांतून सांस्कृतिक वारशाचे जतन आणि आधुनिकीकरण एकत्र साधले गेले. आंतरराष्ट्रीय योग दिवस, कुंभमेळ्याचे जागतिक सांस्कृतिक वारसा यादीत स्थान यामुळे भारतीय संस्कृतीचा गौरव वाढला. पर्यटन वाढवण्यासाठी 'देखो अपना देश', 'प्रसाद' योजना राबवल्या जात आहेत. भारताने २०३० पर्यंत ५०० गिगावॅट अक्षय ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट ठेवले आहे.

आंतरराष्ट्रीय सौर आघाडीच्या माध्यमातून भारत जगाला स्वच्छ ऊर्जेचा मार्ग दाखवत आहे. 'कौशल्य भारत', 'पंतप्रधान विश्वकर्मा' योजनेतून कारागिरांना बळ दिले जात आहे. देशात १.१४ लाखांहून अधिक मान्यताप्राप्त नवउद्यम आहेत व ११०हून अधिक अब्जाधीश नवउद्यम तयार झालेत. खेळातही ऑलिंपिक, आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने आजवरची सर्वोत्तम कामगिरी केली आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे मातृभाषेतून शिक्षण, कौशल्याधारित अभ्यासक्रमावर भर दिला जात आहे. आज भारत केवळ एक बाजारपेठ राहिलेला नाही, तर जगाला दिशा देणारा 'विश्वमित्र' बनला आहे. स्पष्ट धोरण, निर्णयक्षमता आणि 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास' या मंत्रावर चालणाऱ्या वर्तमान केंद्र सरकारच्या काळात देशाने प्रत्येक क्षेत्रात झेप घेतली आहे. आर्थिक महासत्ता, तंत्रज्ञानातील अग्रेसर, संरक्षणात स्वावलंबी आणि मुत्सद्देगिरीत विश्वासार्ह भागीदार म्हणून भारताची ओळख निर्माण झाली आहे. ही गरुडझेप अशीच कायम राहून विकसित भारत २०४७चे स्वप्न पूर्ण होईल, असा विश्वास आज प्रत्येक भारतीयाच्या मनात आहे. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# मोबाइल रात्रभर चार्जिंगला लावता? सावधान!

झोपण्यापूर्वी मोबाइल चार्जिंगला लावला की सकाळी १००% तयार ही जवळपास ९०% लोकांची सवय आहे. पण हीच सवय तुमच्या २०–३० हजारांच्या फोनची बॅटरी कायमची खराब करत आहे. मोबाइल कंपन्या कधीच सांगत नाहीत, पण बॅटरी टेक्निशियनचा हा दावा आहे की रात्रीच्या चार्जिंगमुळे बॅटरीची क्षमता वर्षभरात ४०% ने कमी होते.



सध्याच्या सर्व स्मार्टफोनमध्ये लिथियम–आयन बॅटरी असते. या बॅटरीची खासियत म्हणजे तिला ०% किंवा १००% वर जास्त वेळ राहणे आवडत नाही. तिला २०% ते ८०% या दरम्यान ठेवणे सर्वात योग्य असते. जेव्हा तुम्ही रात्री ११ वाजता फोन चार्जिंगला लावता, तेव्हा पहाटे १ वाजेपर्यंत तो १००% चार्ज होतो. पण सकाळी ७ वाजेपर्यंत म्हणजे पुढचे ६ तास तो १००% वरच चार्जरला लावलेला असतो. १००% झाल्यावर फोन 'ट्रिकल चार्जिंग' मोडमध्ये जातो. म्हणजे १००% वरून ९९% झाली की पुन्हा १००% करतो. हे सायकल रात्रभर ४०–५० वेळा होते. प्रत्येक वेळी बॅटरीवर ताण येतो, ती थोडी–थोडी गरम होते. ही सततची उष्णताच बॅटरीच्या केमिकलला मारते. यालाच 'बॅटरी स्ट्रेस' म्हणतात. ६ महिन्यांत तुमच्या फोनची बॅटरी सकाळी १००% दिसेल, पण दुपारी २ वाजताच २०% वर येईल. बॅटरी २०% च्या खाली जाण्यापूर्वी चार्जिंगला लावा आणि ८०–९०% झाल्यावर काढून घ्या. महिन्यातून फक्त एकदाच ०% ते १००% फुल चार्ज करा. त्याने बॅटरी कॅलिब्रेट होते. संध्याकाळी ७ ते ९ या वेळेत जेवताना किंवा टीव्ही पाहताना फोन चार्ज करा. ८०% झाला की काढा. iPhone आणि नवीन Android फोनमध्ये 'Optimized Battery Charging' नावाचे सेटिंग आहे. ते ऑन करा. ते तुमची झोपण्याची वेळ शिकते आणि ८०% वर चार्जिंग थांबवते. ३३W, ६७W, १२०W चे फास्ट चार्जर बॅटरी खूप गरम करतात. घाई नसेल तेव्हा कंपनीचा जुना १०W किंवा १८W चार्जर वापरा. स्लो चार्जिंगमुळे बॅटरीचे आयुष्य वाढते. चार्जिंग सुरू असताना गेम खेळणे किंवा व्हिडिओ कॉल करणे म्हणजे बॅटरीला एकाच वेळी तापवणे आणि थंड करणे. यामुळे बॅटरी फुगते. फक्त ही एक सवय बदलली तर तुमच्या फोनची बॅटरी ३–४ वर्षे नव्यासारखी काम करेल. स्क्रीन खराब होईपर्यंत बॅटरी बदलायची वेळ येणार नाही.

# 'मिस इंडिया' अभिनेत्री नूतन



## निमित्त

बॉलीवूडच्या सदाबहार अभिनेत्रींमध्ये नूतन या नावाचा समावेश आहे. तिच्या अभिनयाची जादू काहीऔरचं होती. ब्लॅक अँड व्हाईटच्या जमान्यात नूतन एक रंगबेरंगी रत्न होती.रुपेरी पडद्यावर आपल्या अभिनयाच्या विविधांगी छटा कशा उमटवायच्या हे तिला अगदी व्यवस्थित माहित होतं.जिथे महिला घरातून बाहेरदेखील पडत नव्हत्या. अशा काळात तिने मिस इंडियाचा किताब जिंकला, अभिनेत्री होऊन स्वीमसूट परिधान करून सिनेइंडस्ट्री गाजवली. दमदार कारकीर्द आणि सुखी वैवाहिक जीवन असूनदेखील तिच्या आयुष्याचा अंतिम टप्पा वेदनादायी ठरला.

नूतनचा जन्म ४ जून १९३६ रोजी मुंबईत झाला. तिचे वडील प्रसिद्ध सिनेनिर्माता, मराठी कवी आणि आई अभिनेत्री म्हणून कार्यरत होती. पण इंडस्ट्रीत तिला चांगला ब्रेक मिळाला नाही. अखेर लेकीनेच आईला सिनेमांत लॉंच केले. वयाच्या १४ व्या वर्षी तिने १९५० मध्ये प्रदर्शित झालेल्या 'हमारी बेटी' सिनेमातून फिल्म डेब्यू केला. पुढे वयाच्या १६ व्या वर्षी १९५२ मध्ये तिने 'मिस इंडिया'चा ताज जिंकला. तिचे यश बऱ्याच लोकांना बघवत नव्हे. कित्येकांनी कुरूप म्हणत तिची टिंगल केली. पण चेष्टा हेच आपले कौतुक म्हणत नूतनने काम सुरू ठेवले. काही सिनेमात काम केल्यानंतर ती लंडनला गेली आणि परतल्यानंतर तिने 'सीमा' सिनेमात काम केले. ज्यासाठी तिला फिल्मफेअरचा 'सर्वोत्कृष्ट अभिनेत्री' हा पुरस्कार मिळाला. पुढे 'पेइंग गेस्ट', 'बंदिनी', 'अनारी', 'सुजाता कर्मा'सारख्या सिनेमात ती झळकली.

'मिस इंडिया'चा 'किताब पटकावणारी आणि स्वीमसूट घालून सिनेमात काम करणारी नूतन पहिलीच बॉलिवूड अभिनेत्री होती. तिला वयाच्या १४ व्या वर्षी 'मुघल–ए–आझम' सिनेमात अनारकलीच्या भूमिकेची ऑफर आलेली. पण तिने या भूमिकेसाठी नकार दिला होता.

संजीव कुमार यांचे नूतनवर प्रेम होते याविषयी सगळेच जाणतात. पण राजेंद्र कुमार आणि शम्मी कपूर यांचाही नूतनवर जीव जडला होता. राजेंद्र कुमार यांनी नूतनच्या आईकडे तिचा हात मागितला होता. पण त्यांनी हे नाते नाकारले. शम्मी कपूरसुद्धा नूतनच्या प्रेमात होते. विशेष म्हणजे ते एकमेकांना लहानपणापासून ओळखत होते. नूतनच्या आईला या नात्याबाबत अडचण नव्हती. मात्र, तरीही हे लग्न होऊ शकलं नाही. पुढे जाऊन वयाच्या २३ व्या वर्षी लेफ्टनंट कमांडर रजनीश बहल यांच्याशी तिचा विवाह झाला. तिने लग्नानंतर सिनेमा सोडायचा ठरवलं होतं. त्यामुळे दिग्दर्शक बिमल रॉय यांचा 'बंदिनी' सिनेमा तिने नाकारला. पण रजनीश यांनी तिला सिनेमात काम करण्यासाठी प्रोत्साहित केलं आणि पुढे तिची कारकीर्द सुरू राहिली.

अभिनेत्री नूतनला १९९० मध्ये ब्रेस्ट कॅन्सरचे निदान झाले. हळूहळू तिच्या यकृतात कॅन्सर पसरला आणि त्यानंतर १९९१ मध्ये तिचे निधन झाले. शेवटच्या दिवसांत तिची प्रकृती अत्यंत खालावली होती. रुग्णालयात दाखल केल्यानंतर २१ फेब्रुवारी १९९१ रोजी तिने जगाचा निरोप घेतला. आयुष्याच्या अंतिम टप्प्यात अभिनेत्रीने अत्यंत वेदना सहन केल्या. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# लिची खाण्याचे विविध आरोग्यदायी फायदे...

मुळचं दक्षिण चीनमधील लिची हे फळ अनेकांना आवडतं. खायला गोड, रसाळ आणि जिभेला थंडावा देणारं असं हे फळ आहे. याला गुलाबी रंगाचं कवच आणि आत पांढरा रसाळ गर असतो. भारतात हे मे ते ऑक्टोबरमध्ये बाजारात मुबलक प्रमाणात आढळते. बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये याची सर्वाधिक लागवड केली जाते. आज आपण याचे फायदे जाणून घेणार आहोत. ज्यांना पचनाशी संबंधित समस्या आहेत त्यांच्यासाठी लिची फळे फायदेशीर आहेत लिचीचा रस पिणे खूप फायदेशीर ठरू शकते, कारण यामुळे अस्वस्थतेची लक्षणे कमी होतात.



वजन कमी करण्यास मदत करते: लिची फायबरचा एक उत्तम स्रोत आहे, लिचीमध्ये कमीतकमी चरबी आणि कॅलरी असलेल्या पाण्याचे प्रमाण जास्त असते. वजन कमी करण्याच्या प्रवासात समाविष्ट करणे हे एक आदर्श फळ बनवते.

ते हाडे मजबूत करते. कारण लिचीमध्ये लोह, तांबे, कॅल्शियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस, मँगनीज इत्यादी असतात. ही खनिजे कॅल्शियमचे शोषण वाढवतात आणि हाडांची ताकद वाढवतात. त्यामुळे हाडांची नाजूकता कमी होते.

लिचीमध्ये आढळणारे तांबे हे मानवी शरीरात लोहाइतकेच महत्त्वाचे आहे. लिची खाल्ल्याने लाल रक्तपेशींचे उत्पादन वाढते. हे वृद्ध लोकांसाठी उत्तम आहे, कारण ते योग्य रक्ताभिसरणास मदत करते.

लिची फळांच्या फायद्यांमध्ये उच्च रक्तदाब नियंत्रित करणे देखील समाविष्ट आहे. त्यात पोटॅशियम आणि कमी सोडियमचे प्रमाण आहे, जे शरीरातील द्रव राखते, जे चयापचय कार्यासाठी आवश्यक आहे आणि उच्च रक्तदाब. हे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी ताण देखील व्यवस्थापित करते, ज्यामुळे रक्तवाहिन्यांमधून रक्त प्रवाह सुलभ होण्यास मदत होते.

लिचीमधील व्हिटॅमिन सी सामग्री रोगप्रतिकारक शक्ती व्यवस्थापित करण्यासाठी एक उत्तम फळ बनवते.

**लिची फळाचे इतर ज्ञात फायदे**

ते वृद्धत्व कमी करते. लिचीमध्ये आढळणारे व्हिटॅमिन सी फ्री रॅडिकल्सच्या प्रतिकूल प्रभावापासून संरक्षण करते. लिचीमध्ये असलेले पॉलीफेनॉल यकृताचे नुकसान कमी करू शकतात आणि मद्यपान टाळू शकतात चरबी यकृत रोग चरबी जमा होऊ शकते. लिचीमध्ये पॉलीफेनॉलचा समृद्ध स्रोत असल्याने असे म्हटले जाते की अभ्यासानुसार पॉलिफेनॉल मधुमेहाचे व्यवस्थापन करण्यास मदत करतात.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त रोहेकरांना अनमोल भेट

## 'राजमुद्रा'ची रुग्णवाहिका जनसेवेत दाखल



**धाटाव : प्रतिनिधी**

वाढदिवस म्हणजे केवळ शुभेच्छांचा वर्षाव नव्हे, तर समाजाप्रती असलेली बांधिलकी कृतीतून सिद्ध करण्याची संधी असते. याच भावनेतून लोकनेते, दानशूर व्यक्तिमत्त्व तथा माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त रोहा तालुक्यातील नागरिकांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विशेष सहकार्यातून राजमुद्रा फाउंडेशनच्या माध्यमातून अत्याधुनिक रुग्णवाहिका जनसेवेसाठी मंगळवार (दि. २) रोजी पनवेल येथे रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते समर्पित करण्यात आली.

आजही अनेक ग्रामीण भागांमध्ये वेळेत रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने रुग्णांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. अशा वेळी ही रुग्णवाहिका केवळ एक वाहन नसून संकटसमयी धावून येणारी जीवनदायिनी ठरणार आहे. विशेषतः धाटाव विभागातील ग्रामीण भाग, धाटाव एमआयडीसी परिसर तसेच रोहा तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांसाठी ही सेवा मोठा आधार ठरणार आहे. या प्रसंगी राजमुद्रा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अमित घाग, सचिव सचिन मोरे, वर्षा ठाकूर, कार्याध्यक्ष राजेश भगत, सचिव सचिन भोरे, विलास डाके, श्रद्धा कुंडे, श्रीकांत दर्डे, अमर वारंगे, जितेंद्र जाधव, अपूर्व ठाकूर , श्रद्धा घाग, शिवाजी दिवकर, सार्थक डाके , साईश घाग , कार्याध्यक्ष राजेश भगत, प्रितेश वारंगे, अमोल घाग, जितेंद्र जाधव, सागर डाके, रवी ठाकूर, सुबोध पाटील, साहिल जोधले आणि ॲड. दिनेश वर्मा यांनी ऑनलाईन माध्यमातून सहभाग नोंदवत या लोकहितकारी उपक्रमाचे कौतुक केले.

रोहेकरांच्या सुख-दुःखात कायम सहभागी राहण्याची परंपरा जपणाऱ्या ठाकूर कुटुंबाच्या जनसेवेच्या वाटचालीत हा आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. समाजसेवा ही केवळ शब्दांत नसून ती कृतीतून दिसली पाहिजे. एखाद्या गरजू रुग्णाला योग्य वेळी उपचार मिळणे आणि त्याचा जीव वाचणे यापेक्षा मोठे पुण्य दुसरे नाही. राजमुद्रा फाउंडेशनच्या माध्यमातून जनतेसाठी समर्पित करण्यात आलेली ही रुग्णवाहिका रोहा तालुक्यातील नागरिकांसाठी मोठा आधार ठरेल. ही रुग्णवाहिका अनेक गरजू रुग्णांना वेळेत वैद्यकीय सेवा मिळवून देईल, अनेक कुटुंबांना दिलासा देईल आणि अनेकांचे प्राण वाचविण्याचे पुण्यकार्य करेल, असा मला विश्वास आहे. जनसेवेचा हा वसा भविष्यातही अखंडपणे सुरू राहावा, हीच वाढदिवसानिमित्त माझ्यासाठी सर्वात मोठी शुभेच्छा आहे," असे गौरवोद्गार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केले.

यावेळी आमदार प्रशांतदादा ठाकूर यांनी राजमुद्रा फाउंडेशनचे संस्थापक तथा अध्यक्ष अमित घाग यांच्या समाजोपयोगी कार्याचे विशेष कौतुक केले. सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य, शिक्षण, क्रीडा आणि जनकल्याणाच्या विविध क्षेत्रांत सातत्याने राबविण्यात येणारे उपक्रम हे समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. विशेषतः सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी, गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी तसेच आरोग्यविषयक सेवांच्या बळकटीकरणासाठी अमित घाग व राजमुद्रा फाउंडेशन करीत असलेले कार्य उल्लेखनीय असून, समाजहिताची जाणीव ठेवून कार्य करणारे असे तरुण नेतृत्व भविष्यात अधिक व्यापक स्तरावर जनसेवा करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## आठवडे बाजारात कांदे, बटाट्याला अधिक मागणी

**तळा : प्रतिनिधी**

तालुक्याचे ठिकाण असलेल्या तळा येथे बुधवारच्या बाजारात पावसाळ्या पुर्वीच्या खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी पहावयास मिळाली असून कांदे बटाटी खरेदीकडे अधिक कल असल्याचे पहावयास मिळाले आहे.

तालुक्यातील एकच आठवडी बाजार भरत आहे.या आठवडी बाजारात कांदे,बटाटे बाजारात अधिक दिसत असून कांदे बटाटी खरेदी अधिक प्रमाणात झाली आहे.त्याच बरोबर पावसाळ्यात प्लास्टीक कापड, सुकी मच्छी,खरेदी अधिक प्रमाणात नागरिकांनी केली आहे.या बाजारामुळे एकच ठिकाणी अनेक विविध वस्तू साहित्य मिळते व काही साहित्य हे स्वस्त मिळत असल्याने ग्रामिणभागातील नागरिक मोठ्या प्रमाणात येथे खरेदीसाठी येतात.

हा बुधवारचा बाजार सुक्यामच्छीसाठी प्रसिद्ध असल्याने माणगाव, इंदापूर,रोहा ,म्हसळा तळा ग्रामीण भागातील येथील नागरिक तळा बाजारात खरेदीसाठी येत असतात.नागरिकांनी पावसाळ्याच्या दृष्टीने खरेदी केली असल्याचे चित्र पहावयास मिळाले आहे.



## प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे सेवानिवृत्त

**रोहा : प्रतिनिधी**

को.ए.सो.चे डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य वाणिज्य व सौ.कुसुमताई ताम्हणे कला महाविद्यालय रोहाचे प्राचार्य डॉ अतुल साळुंखे ३७ वर्ष ज्ञानार्जनची अर्थशास्त्रातील सेवा बजावुन ३१ मे रोजी सेवा निवृत्त झाले.

या सेवानिवृत्त समारोप प्रसंगी को.ए.सो.चे प्रशासन अधिकारी प्रा.सुरेंद्र दातार, सहायक प्रशासन अधिकारी डॉ.संदेश गुरव, प्राचार्य डॉ.दिनेश भगत, प्राचार्य अनिल बांगर, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते धर्माजी कोळी,डॉ.कमलाकर कांबळे,प्रा.सुकुमारपाटील, प्रा.सीमा भोसले,प्रा.कृष्णा जांभेकर, प्रा.विनय शेलार, आशिष शहा, शाम पाटील, अनिल ठाकुर उपस्थित होते.

यावेळी प्रा. सुरेंद्र दातार यांच्या हस्ते सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे यांचा सत्कार करण्यात आला.



## राजे यशवंतराव होळकर इंग्रजी माध्यम निवासी शाळांचे प्रस्ताव सादर करावेत

### धनगर समाजातील विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या शाळांना आवाहन

**अलिबाग :** इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या राजे यशवंतराव होळकर इंग्रजी माध्यम निवासी शिक्षण योजनेंतर्गत धनगर समाजातील विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या शाळांनी प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण सुनील जाधव यांनी केले आहे.

विद्यार्थी व शाळेकरिता या योजनेंत्तर्गत देण्यात येणारे लाभ :- विद्यार्थ्यांसाठी रेनकोट, भोजन, निवास खर्च, ट्युशन फी, सुरक्षा अनामत, शिक्षण शुल्क इत्यादीसाठी देय रक्कम संबंधित नामांकित निवासी शाळेला देण्यात येईल. निवासी शाळेत राहणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्षातून दोनादा पालकांना भेटण्यासाठी स्वग्रामी जाण्याकरिता प्रवास खर्च देण्यात येईल. वर्षातून दोनदा पालकांना पाल्यांना शाळेत येऊन भेटण्याकरिता प्रवास खर्च देण्यात येईल. शुल्क, संबंधित विद्यार्थी इयत्ता बारावी पास होईपर्यंत देय राहील तसेच प्रस्ताव प्राप्त झालेल्या शाळेस तपासणीकरिता भेट देतील. निकषांच्या आधारे गुणांकन करुन शाळांना शुल्क निर्धारीत करण्यात येतील.

**पनवेल महानगरपालिका**
तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | M/s. EV Natural Perfect Homes, Survey No. 24A/4/1, At - Rohinjan, Tal. Panvel | ०२ बोर झाडे तोडणे. | Survey No. 24A/4/1, At - Rohinjan, Tal. Panvel येथे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| २ | संचालक, भारती विद्यापीठ विभागीय कार्यालय, नवी मुंबई | ०६ नारळ, ०२ आंबा व ०१ जांभूळ अशी एकूण ०९ झाडे तोडणे. | भारती विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुल, सेक्टर ०७, खारघर या भूखंडाच्या आवारात अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शेजारील जागेत ६६० के.एल.डी. क्षमतेचा STP प्लँटचे बांधकाम करणेस ०९ झाडे बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०३/०६/२०२६

PMC-PARK/232/2026-PTAD

**सही /-**
**उपायुक्त**
तथा वृक्ष अधिकारी
पनवेल महानगरपालिका

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी
राम प्रहर

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी **श्री. पुलकित नेहरा** यांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **२१ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे चिंचवली तर्फे वाजे तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| गट/सर्व्हे नंबर | उपविभाग/ हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. | नाव |
|---|---|---|---|---|
| ५७ | ३ | ०-५०-९० पो.ख. ०-१३-२० | १०.५७ | श्री. गणपत बामा पाटील |
| | | **एकूण ०-६४-१०** | | |

वरील एकुण मिळकत ०-६४-१० हे. आर. पॉ., आकार १०.५७ रू. पैसे पैकी विक्री क्षेत्र ०-२४-०० हे. आर. पॉ.

पनवेल.
दिनांक : ०३/०६/२०२६.

**सही /-**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
ॲडव्होकेट
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. मो. नं. ९०२२३१७७७२.

**पनवेल महानगरपालिका, पनवेल ४१० २०६**
**जाहीर नोटीस**

सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत मौजे- कोयनावेळे, ता. पनवेल येथील सर्व्हे नं. २ पासून ते सर्व्हे नं. ६ पर्यंतच्या १८.०० मी. रूंदीच्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये दि. ०८/०८/२०२४ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८(४) अन्वये दि. २५/०६/२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या विकास योजनानुसार नियोजित रस्त्यामधील मोजे- कोयनावेळे येथील सर्व्हे नं. ६/२ मधून प्रस्तावित १८.०० मी. रस्त्याखालील बाधित क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी.आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सहाय्यक संचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१० २०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पनवेल महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टी.डी.आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णन :- मौजे कोयनावेळे, ता. पनवेल येथील श्री. मंगेश भि. कदम व इतर यांचे मालकीच्या जमीन मिळकतीमधील आरक्षणाने बाधित व रस्त्याने बाधित क्षेत्र पुढीलप्रमाणे : १) मौजे - कोयनावेळे, सर्व्हे नं. ६/२ रस्त्याने बाधित क्षेत्र - २०६९.७८ चौ. मी.

त्यास नकाशानुसार चतुःसीमा खालीलप्रमाणे -
पुर्वेस : ला. स.नं. ६/३
पश्चिमेस : ला. स.नं. ६/१, ६/७
दक्षिणेस : ला. स.नं. ४
उत्तरेस : ला. स.नं. २९/५

टिप :- उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे.

दिनांक : ०३/०६/२०२६
जा क्र. : पमपा/नरवि/टिडीआर/२६-२६/३२६/२०२६

**सही/-**
**सहाय्यक संचालक नगररचना**
पनवेल महानगरपालिका,

टिप - सदरची जाहीर नोटीस पनवल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's
**RAMSHETH THAKUR HIGHER SECONDARY VIDYALAYA, KHARGHAR**
Plot No: 1, Sector -33, Kharghar. Tal- Panvel. Dist- Raigad. Navi Mumbai - 410210
**STAFF RECRUITMENT**
Applications are invited for the following posts for the Academic Year 2026-2027 Only (Self Finance School)
Full Time Asst. Teachers on Purely Temporary basis for the following subjects

| Sr. No | Section / Post | Subject | Educational Qualification | Requirement Staff |
|---|---|---|---|---|
| 1 | HIGHER SECONDARY SECTION (ASST. TEACHER) | MATHEMATICS | M.Sc. B.Ed. | 02 |
| 2 | | GEOGRAPHY | M.A. B.Ed. | 01 |
| 3 | | COMPUTER SCIENCE | M.E./MCA/M. Sc Computer Science | 01 |

- Applications with full details (Email address & WhatsApp no) should reach with attested xerox copies of certificates to Chairman, J.B.S.P. Sanstha, Ramsheth Thakur Higher Secondary Vidyalaya, Kharghar, Plot No: 1, Sector -33, Near Pethpada Railway Station Kharghar,Tal- Panvel. Dist-Raigad. - 410210.
- Candidates may submit the application by email to **principalrthsv@gmail.com** or **by post** on or before **12/06/2026**
- If required Contact -
**Mrs. Nisha Nair (I/C Principal)- 9987476532**
**Mrs. Kalyani Mhatre (Jr. Clerk)- 9870115721**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex M.P.)**
**CHAIRMAN**
Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha Panvel

Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's
**SMT. BHAGUBAI CHANGU THAKUR VIDYALAYA, DRONAGIRI**
Plot No: 60/61, Sector-12, Tal: Uran, Dist.: Raigad-400707
**STAFF RECRUITMENT**
Applications are invited for the following posts for the Academic Year 2026-2027 (Self Finance School)
Full Time Asst. Teachers on Purely Temporary basis for the following subjects

| Sr. No | Section | Post | Educational Qualification | Requirement Staff |
|---|---|---|---|---|
| 1 | UPPER PRIMARY TO SECONDARY | HEADMASTER | Post-Graduation and B.Ed. / M.Ed. from recognised university with 5 years of teaching experience and 5 years in administrative position in state School | 01 |
| 2 | UPPER PRIMARY TO SECONDARY | ASST. TEACHER | B.Sc., M.Sc. B.Ed. (Mathematics) | 01 |
| | | ASST. TEACHER | B.A., M.A. B. Ed (English) | 01 |
| | | ASST. TEACHER | B.A., M.A. B. Ed (Social Studies) | 01 |
| 3 | PRIMARY TO UPPER PRIMARY | PHYSICAL EDUCATOR | B. A., B. P. Ed | 01 |

- Applications with full details (Email address & WhatsApp no) should reach with attested xerox copies of certificates to Chairman, J.B.S.P. Sanstha, Plot No: 60/61, Sector-12, Dronagiri Node,Tal- Uran. Dist.: Raigad-400707.
- Candidates may submit the application by email to **bctvidyalaya@gmail.com** or **by post** on or before **12/06/2026**
- If required Contact -
**Mrs. Anuradha Kathe (I/C Head Mistress) - 9819212918**
**Mrs. Snehal Patil (Accountant) - 9594964872**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex M.P.)**
**CHAIRMAN**
Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha Panvel

Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's
**MORU NARAYAN MHATRE VIDYALAYA & T. N. GHARAT JR. COLLEGE, GAVHAN - KOPAR**
Plot No: 01, Ulwe Node, At-Post- Gavhan-Kopar, Tal- Panvel, Dist : Raigad - 410206
**STAFF RECRUITMENT**
Applications are invited for the following posts for the Academic Year 2026-2027 (Self Finance School)
Full Time Asst. Teacher on Purely Temporary basis for the following subject

| Sr. No | Name of the Branch | Section | Post/ Subject | Educational Qualification | Requirement Staff |
|---|---|---|---|---|---|
| 1 | MORU NARAYAN MHATRE VIDYALAYA & T. N. GHARAT JR. COLLEGE, GAVHAN - KOPAR | PRE-PRIMARY | ASST. TEACHER | H S C, / B. A, /B. Com / B.Sc./with ECCED | 01 |
| | | PRIMARY | LIBRARIAN | B. A, /B. Com / B.Sc./with B. Lib/ M. Lib | 01 |
| | | SECONDARY | ASST. TEACHER | M.A., B. Ed (S.S.T.& Geography) | 01 |

- Applications with full details (Email address & WhatsApp no) should reach with attested xerox copies of certificates to Chairman, J.B.S.P. Sanstha, Plot No: 01, Ulwe Node. At-Post-Gavhan-Kopar,Tal- Panvel, Dist: Raigad-410206
- Candidates may submit the application by email to **mnmv.primary@gmail.com** or **by post** on or before **12/06/2026**
- If required Contact -
**Mrs. Sayali Wadwalkar (I/C Principal) - 7738397656**
**Mrs. Chaitali Kadu (Jr. Clerk) - 9773323876**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex M.P.)**
**CHAIRMAN**
Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha Panvel

Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's
**CHANGU KANA THAKUR VIDYALAYA, NEW PANVEL**
Plot No: 8, Sector -14, New Panvel Tal- Panvel. Dist- Raigad. Navi Mumbai - 410206
**STAFF RECRUITMENT**
Applications are invited for the following posts for the Academic Year 2026-2027 Only
Full Time Asst. Teachers on Purely Temporary basis for the following subjects

| Sr. No | Name of the Branch | Section | Post/ Subject | Educational Qualification | Requirement Staff |
|---|---|---|---|---|---|
| 1 | CHANGU KANA THAKUR VIDYALAYA, MARATHI MEDIUM NEW PANVEL | PRE-PRIMARY | ASST. TEACHER | H S C, / B. A, / B. Com / B.Sc./with ECCED | 01 |
| | | PRIMARY | ASST. TEACHER | B. A, /B. Com / B.Sc./with D.Ed./ D. T. Ed. (English Medium & TET Pass | 01 |
| | | | SPORTS TEACHER | B. A, / B. Com/ B.Sc./ with B. P. Ed | 01 |
| 2 | CHANGU KANA THAKUR VIDYALAYA, ENGLISH MEDIUM NEW PANVEL | SECONDARY | ASST. TEACHER | B.A., M.A., B. Ed ( Hindi) | 01 |
| | | | ASST. TEACHER | B.Sc., M.Sc. B.Ed. (Mathematics) | 01 |
| 3 | CHANGU KANA THAKUR HIGHER SECONDARY VIDYALAYA, NEW PANVEL | HIGHER SECONDARY SECTION (JR. COLLEGE) | ASST. TEACHER | M.A. B. Ed (English) | 01 |
| | | | ASST. TEACHER | M. Com., B. Ed (COMMERCE) | 01 |

- Applications with full details (Email address & WhatsApp no) should reach with attested xerox copies of certificates to Chairman, J.B.S.P. Sanstha, Plot No.08, Sector -14, New Panvel, Tal- Panvel, Dist- Raigad - 410206.
- Candidates may submit the application by email to **jbspsanstha1992@gmail.com** or **by post** on or before **12/06/2026**
- If required Contact -
**Mrs. Saylee Patankar – (Sanstha Office)- 9930718675**
**Mr. Prasant More - (I/C Principal-Jr-College)- 9867754458**
**Mr. Subhash Mankar - (Headmaster-Marathi Primary)- 8082802121**
**Mrs. Swati Kale - (Headmistress- English Secondary)- 9920140995**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex M.P.)**
**CHAIRMAN**
Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha Panvel

# आरोग्यसेवेची गुणवत्ता वाढवा!

## आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे आरोग्य विभागाला निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेची २६ नागरी आरोग्य केंद्रे, दोन माता बाल रुग्णालये व तीन सार्वजनिक रुग्णालये यांद्वारे नागरिकांना आरोग्य सेवा पुरविल्या जात असून त्यातील गुणवत्ता वाढीसाठी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्याकडून नियमितपणे आढावा बैठका घेतल्या जात आहेत. प्राथमिक स्तरावरील वैद्यकीय तपासणी व उपचार नागरी आरोग्य केंद्रांमार्फत केले जात असून त्यांच्याकडे उपलब्ध होणारी नागरिकांच्या आरोग्य स्थितीची माहिती अचूक व अद्ययावत असावी याकडे बारकाईने लक्ष देण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.



विविध लसीकरण कार्यक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग मिळावा व नागरिकांनी लाभ घ्यावा यासाठी मोठ्या सोसायट्या, झोपडपट्टी भागात जागरूकता शिबिरे घ्यावीत. जनजागृतीसाठी स्वयंसेवी संस्थांचा सहभाग घ्यावा, आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित करावे व स्थानिक पातळीवर लोकप्रतिनिधींचे सहकार्य घ्यावे, अशा सूचना आयुक्तांनी केल्या. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर साथरोगाचा धोका लक्षात घेऊन प्रतिबंधात्मक कार्यवाही आत्तापासूनच प्रभावीपणे सुरू करावी. मलेरिया प्रतिबंधासाठी सर्वात जोखमीचे क्षेत्र असलेल्या बांधकाम साइट्सवर लक्ष केंद्रित करावे, असेही सूचित करण्यात आले.

महानगरपालिकेच्या टेस्टिंग लॅबमध्ये थॅलेसेमिया, स्वाईन फ्लू अशा चाचण्या करण्याबाबत कार्यवाही करावी. ऑक्सिजन प्लान्टची स्थलांतरण कार्यवाही जलद करावी आणि सर्व व्हेंटिलेटर उपयोगात आणण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, असे निर्देश दिले.आयुष्मान भारत कार्डची वितरण कार्यवाही जलद करावी तसेच सर्व रुग्णांची माहिती डिजिटल करण्याबाबत पावले उचलावीत, असेही सूचित करण्यात आले. महानगरपालिकेच्या रुग्णालयातील माता–बालमृत्यूची माहिती घेताना मृत्यूची कारणमीमांसा जाणून घेऊन डेथ ऑडिट करण्याच्या सूचना देतानाच मृत्यूमागील कारणांचा अभ्यास करून पुढील काळातील सुयोग्य उपचारांसाठी व मृत्यूदर कमी करण्यासाठी त्या माहितीचा उपयोग करावा, असे आयुक्तांनी सांगितले.

बैठकीस वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. राजेश म्हात्रे, उपायुक्त डॉ. अजय गडदे, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. धनवंती घाडगे व डॉ. रत्नप्रभा चव्हाण, तिन्ही सार्वजनिक रुग्णालयांचे वैद्यकीय अधीक्षक, दोन माता बाल रुग्णालयांचे वैद्यकीय अधिकारी, विविध आरोग्य कार्यक्रमांचे वैद्यकीय अधिकारी, पीजी मेडिकल इन्स्टिट्यूटचे डीन डॉ. ज्ञानेश बेलेकर उपस्थित होते.

## पीओपी मूर्तींच्या पुनर्वापरातून विविध वस्तू

**नवी मुंबई : बातमीदार**

पर्यावरण जपणुकीसाठी पीओपी मूर्तींच्या पुनर्वापरावर शाश्वत उपायोजना करण्याच्या दृष्टीने पर्यावरण क्षेत्रातील विविध संस्था व संशोधकांसोबत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक पार पडली. यावेळी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नोलॉजीतर्फे पीओपी पुनर्प्राप्तीचा प्रायोगिक प्रकल्प, लहान प्रमाणात कचरा प्रक्रिया तंत्रज्ञान तसेच विकेंद्रित कचरा व्यवस्थापन मॉडेल यांची माहिती मांडण्यात आली.

आयसीटीमार्फत नवी मुंबईत पुनर्वापर प्रकल्प उभारण्याची संकल्पना मांडण्यात आली असून याविषयी व्यवहार्यता तपासली जाईल, असे महानगरपालिकेने स्पष्ट केले. मूर्तीकार संघटनेने पुनर्वापरात येणाऱ्या पीओपीचा वापर नव्या मूर्ती बनविण्यासाठी सहमती दर्शवली.नुओटेरा संस्थेमार्फत पीओपी मूर्तींचा पुनर्वापर करून शालेय फर्निचर, जसे की अभ्यासाचे टेबल बनवण्याचे नाविन्यपूर्ण मॉडेल सादर करण्यात आले. विसर्जित मूर्ती पुनर्वापरासाठी सुपूर्द करण्याकरिता सामंजस्य कराराचा प्रस्तावही मांडण्यात आला. प्रोजेक्ट मुंबई संस्थेमार्फत पर्यावरण विषयक उपक्रमांमध्ये सार्वजनिक सहभागासाठी 'नागरी स्वयंसेवक पोर्टल' विकसित करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला. तसेच नवी मुंबई शहराला सर्वात सुरक्षित शहरांपैकी एक बनवण्यासाठी नागरिक सहभागावर भर देणारे 'अग्नि सुरक्षा व्हिजन' सादर केले.

महाराष्ट्र हवामान सप्ताह २०२७ मध्ये शहरी जैवविविधतेच्या वैज्ञानिक व्यवस्थापनाच्या आधारावर महाराष्ट्राला अग्रणी स्थान देण्यासाठी नवी मुंबई महापालिकेच्या योगदानावर चर्चा झाली. नुकत्याच झालेल्या वृक्ष गणनेनुसार महापालिका क्षेत्रात २२५ हून अधिक जागांमध्ये १५ लाखांहून अधिक झाडे असून शहराचे पर्यावरणीय मूल्य वाढवण्यासाठी देशी वृक्षारोपणावर भर दिला जात असल्याचे आयुक्तांनी सांगितले. स्थानिक पर्यावरण व्यवस्थापनासाठी 'सिव्हिक मार्शल'चे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.आर्ट ऑफ लिव्हिंगच्या इको क्रांती उपक्रमांतर्गत एकल वापराच्या प्लास्टिकला जैवविघटनशील उत्पादनांचे पर्याय मांडण्यात आले. प्रेसपल इंडियामार्फत उद्याने व शेतीतील कचऱ्यापासून बनविलेल्या बायोमास ब्रिकेट्सचा अंत्यविधीसाठी उपयोग करून लाकडांच्या बचतीच्या उपक्रमाचे सादरीकरण झाले.

दरम्यान, आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ मधील तरतुदींवर भाष्य करत दररोज १०० किलो पेक्षा अधिक कचरा निर्माण करणाऱ्या संस्था, सोसायट्यांच्या जबाबदाऱ्या व अंमलबजावणी यंत्रणेवर लक्ष देण्याची गरज व्यक्त केली. गणेशोत्सव व नवरात्रौत्सव काळात विसर्जन व्यवस्थेवर लक्ष ठेवण्यासाठी जीपीएस टॅगिंगद्वारे मूर्तींची ट्रेसिबिलिटी असण्याची गरज अधोरेखित केली. पीओपी मूर्तींच्या सुयोग्य व्यवस्थापनासाठी तज्ज्ञांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.रोटरी क्लब पदाधिकाऱ्यांनी महापालिकेच्या पर्यावरणशील उपक्रमांची प्रशंसा करून वृक्ष संवर्धनासाठी योगदान देण्याची संमती दर्शवली.

## महापौर आणि उपमहापौरांच्या उपस्थितीत विशेष जलतपासणी मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

मोरबे धरणाची पाणी पातळी सध्या ७१.५ मीटर असून १५.७४ टक्के जलसाठा वापरण्यायोग्य आहे. हा साठा जुलैअखेरपर्यंत पुरेल इतका आहे, मात्र आसपासच्या शहरांमधील पाणीटंचाईची स्थिती आणि हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदा पावसाचे प्रमाण कमी असल्याने नवी मुंबईकरांनी पाण्याचा अत्यंत काळजीपूर्वक वापर करावा, असे आवाहन महापौर सुजाता पाटील यांनी केले आहे.



पाण्याचा कोणत्याही प्रकारे अपव्यय होणार नाही याची प्रत्येक नागरिकाने काळजी घ्यावी, असे त्या म्हणाल्या. दोन दिवसांच्या शटडाऊनमध्ये जलवाहिन्या कोरड्या झाल्याने आतील बारीक गाळ पाणीपुरवठा पूर्ववत झाल्यानंतर जलकुंभापर्यंत आला व गढूळ पाण्याच्या तक्रारी येऊ लागल्या. यामुळे पाणी पुरवठा विभागामार्फत शहराच्या विविध भागात मोठ्या प्रमाणात जलतपासणी मोहीम हाती घेण्यात आली. महापौर, उपमहापौर यांच्यासह नगरसेवकांनीही विविध विभागांत जाऊन जलतपासणी चाचणीची पाहणी केली.

या पाहणीत आंतरराष्ट्रीय आयएसआय मानकानुसार पाणी नमुन्यातील पीएच, टीडीएस, टर्बिडिटी व क्लोरिनचे प्रमाण तपासण्यात आले. तपासणीत पाणी पिण्यायोग्य असल्याचे आढळले. नागरिकांना पाणी दूषित असल्याची शंका असल्यास तक्रार करण्यासाठी १८००२२२३०९ हा टोल फ्री क्रमांक जाहीर करण्यात आला आहे. आता तक्रारींचे प्रमाण कमी झाले असून पाणी पूर्वीसारखे स्वच्छ मिळू लागले आहे. तुर्भे, वाशी भागातील पाणी नमुने तपासणी विशेष मोहिमेच्या पाहणीप्रसंगी काही ठिकाणी जलवाहिन्यांमध्ये लिकेजेस असल्याने नळाद्वारे मिळणारे पाणी गढूळ असल्यास लिकेजेस शोधून तातडीने दुरुस्त करण्याचे निर्देश महापौर सुजाता पाटील यांनी दिले.

यावेळी उपमहापौर दशरथ भगत, क प्रभाग समिती अध्यक्ष प्रकाश मोरे, ड प्रभाग समिती अध्यक्षा शैला पाटील, नगरसेवक शशिकांत राऊत, दयावती शेवाळे, शशिकला पाटील, अंजली वाळुंज, सुनील कुरकुटे, शशिकला औटी, शिल्पा ठाकूर, प्रिती भगत तसेच अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, कार्यकारी अभियंता शंकर जाधव, संतोष उनवणे व इतर अधिकारी उपस्थित होते. महापौरांनी तुर्भे येथील मलप्रक्रिया केंद्र व टर्शिअरी ट्रिटमेंट प्लांटचीही पाहणी केली. गावठाण भागातील जलवाहिन्या जुन्या झाल्याने मोठ्या प्रमाणात लिकेजेस असल्याचे सांगत नगरसेवकांनी त्या वाहिन्या बदलण्याची गरज व्यक्त केली.

काही नागरिकांनी महानगरपालिकेने केलेली १०% पाणीकपात सध्याची पाण्याची कमतरता लक्षात घेता २०% पर्यंत करावी, अशी सूचना केली. तसेच पाणीटंचाईच्या काळातही गाड्या धुण्यासाठी पाईप लावून पाण्याचा अनाठायी वापर करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली. मोठ्या कालावधीच्या शटडाऊनमुळे पाणी गढूळ असण्याच्या तक्रारी अधिक आल्या होत्या. आता पाण्याची स्थिती जवळपास पूर्ववत झाली असून महानगरपालिकेमार्फत पाण्याच्या चाचण्या सुरूच ठेवल्या जाणार आहेत.

## "चेंजिंग माईंडस": विचार परिवर्तनातून सेवापरिवर्तनाकडे सिडकोचा उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

कर्मचारी कार्यक्षमता, नैतिकता, उत्तरदायित्व आणि लोकाभिमुख सेवा यांना नवी दिशा देण्यासाठी सिडकोमध्ये "चेंजिंग माईंडस" उपक्रमाची नव्या संकल्पना आणि तत्त्वज्ञानासह पुनश्च सुरुवात करण्यात आली. सिडको भवन येथील सभागृहात आयोजित कार्यशाळेत महामंडळातील विभागप्रमुख आणि विभागीय अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पूर्वी या उपक्रमांतर्गत विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांना मार्गदर्शनासाठी आमंत्रित करण्यात येत होते, मात्र यावेळी प्रथमच संस्थेतील अनुभवी वरिष्ठ अधिकारी, त्यांचे ज्ञान, अनुभव आणि नेतृत्वगुण यांचा उपयोग करून कर्मचाऱ्यांशी अधिक परिणामकारक संवाद साधण्याची अभिनव संकल्पना राबवण्यात आली.

संस्थेच्या अंतर्गत बौद्धिक संपदेचा उपयोग करत सकारात्मक कार्यसंस्कृती निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.सहव्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल यांनी मार्गदर्शन करताना सांगितले, "प्रत्येक परिवर्तनाची सुरुवात मनापासून होते. व्यवस्था बदलण्यापूर्वी विचारसरणीत सकारात्मक बदल घडवणे आवश्यक आहे. 'चेंजिंग माईंडस' हा केवळ प्रशिक्षण कार्यक्रम नसून स्वतःला अधिक सक्षम, संवेदनशील आणि उत्तरदायी बनवण्याचा प्रवास आहे. नागरिकांना वेळेत, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण सेवा देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. सहव्यवस्थापकीय संचालक–३ गणेश देशमुख म्हणाले, "महाराष्ट्र



शासनाच्या 'सेवा हक्क' आणि लोकाभिमुख प्रशासनाच्या संकल्पनांना बळकटी देण्यासाठी प्रत्येक विभागाने कार्यक्षमतेची नवी मानके निर्माण करणे आवश्यक आहे. नागरिकांच्या अपेक्षांनुसार जलद, पारदर्शक आणि परिणामकारक सेवा देण्यासाठी प्रत्येकाने स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवणे ही काळाची गरज आहे."

मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांनी सांगितले, "प्रशासकीय यंत्रणेत नियमांइतकीच संवेदनशीलताही महत्त्वाची असते. प्रत्येक कर्मचाऱ्याने आपल्या भूमिकेकडे केवळ नोकरी म्हणून नव्हे, तर सार्वजनिक उत्तरदायित्व म्हणून पाहिले पाहिजे. संस्थेची प्रतिमा कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकपणा, कार्यक्षमता आणि कार्यसंस्कृतीवर उभी असते."या उपक्रमाचा उद्देश केवळ भ्रष्टाचाराला आळा घालणे नसून, सेवाभिमुख प्रशासन, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि परिणामकारक सेवा वितरण यांना संस्थात्मक संस्कृतीचा भाग बनवणे हा आहे. महाराष्ट्र शासनाच्या "सेवा हक्क" उपक्रमामुळे शासकीय विभागांच्या कामगिरीचे मूल्यमापन होत असून, नागरिकांना अधिक वेगवान व गुणवत्तापूर्ण सेवा देण्यावर भर दिला जात आहे.कार्यशाळेदरम्यान कार्यप्रणालीतील अडथळे दूर करणे, कामकाज सुसूत्र व कार्यक्षम बनवणे, प्रलंबित प्रकरणांचे वेळेत निवारण करणे तसेच नागरिकांच्या अपेक्षांशी सुसंगत कार्यसंस्कृती विकसित करणे यावर चर्चा झाली.

उपस्थित अधिकाऱ्यांनी उपक्रमाला प्रतिसाद देत सकारात्मक परिवर्तनाची नवी ऊर्जा निर्माण झाल्याची भावना व्यक्त केली.'चेंजिंग माईंडस' केवळ संकल्पना नसून विचार, वृत्ती व कार्यपद्धतीत सकारात्मक परिवर्तन घडवणारी चळवळ ठरेल. सिडकोच्या लोकाभिमुख, पारदर्शक व परिणामकारक प्रशासनाच्या वाटचालीला गती देईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन दक्षता विभागातर्फे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

## संकष्टीला चिरनेरचे महागणपती मंदिर भाविकांनी फुलले; रानमेव्याला मोठी मागणी

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील तीर्थक्षेत्र चिरनेर येथे बुधवारी (दि.३) संकष्टी चतुर्थीनिमित्त श्री महागणपतीच्या दर्शनासाठी भाविकांनी पहाटेपासूनच रांगा लावल्या होत्या. रायगड, नवी मुंबईसह हजारो भाविकांनी आराध्य देवतेचे दर्शन घेतले. दर्शनासाठी मोठी गर्दी झाल्याने श्रींचे दर्शन घेण्यास अधिक वेळ लागत होता, मात्र भाविकांनी रांगेतच दर्शन



घेण्यास प्राधान्य दिले.

यावेळी मुख्य मंदिराचा गाभारा फुलांच्या माळांनी सजवण्यात आला होता. परिसरातील दुकाने ग्राहकांनी गजबजली होती. शोभिवंत वस्तू, हॉटेल, नारळ, हार, फुले, मातीची भांडी, पापड, कडधान्य विक्रेते तसेच प्रसाद व पेढेविक्रेत्यांचा व्यवसाय तेजीत होता. आंबे, जांभळे, करवंदे, कंदमुळे, विविध रानभाज्या आणि फळे अशा रानमेव्याला यावेळी मोठी मागणी होती. रानमेवा घेऊन आदिवासी आणि आगरी समाजाच्या महिला विक्रेत्या विक्री करीत होत्या. मंदिरात येणारे भाविक आवर्जून हा ग्रामीण रानमेवा आनंदाने खरेदी करीत होते. त्यामुळे श्री महागणपती मंदिर परिसरात मोठी वर्दळ दिसून आली.


## मारहाणप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा

**नवीन पनवेल :** ४८ वर्षीय व्यक्तीला ठार मारण्याच्या उद्देशाने लाथाबुक्क्यांनी मारहाण करून गंभीर जखमी केल्याप्रकरणी दोघांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात १ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. अनिता कातकरी यांचे चुलत मामा सासरे योगेश कातकरी याच्या मुलाच्या मोटरसायकलला आडवे गेल्याने मोटारसायकल स्लिप होऊन तो पडला व जखमी झाला. याचा राग धरून योगेश कातकरी व गणेश कातकरी यांनी ३१ मे रोजी रात्री ११च्या सुमारास फिर्यादीच्या चुलत मामा सासऱ्यांना "तुला संपवून टाकतो" असे म्हणत जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

## 'एफडीए'ची एपीएमसीत धडक कारवाई; ११ लाखांचे आंबे, साडेचार लाखांचा गुटखा जप्त

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी) परिसरातील भेसळयुक्त अन्नपदार्थ आणि प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीविरोधात मोठी कारवाई करण्यात आली. दोन दिवसांच्या छापेसत्रात कृत्रिमरीत्या पिकवलेले ११ लाख रुपयांहून अधिक किमतीचे आंबे आणि सुमारे साडेचार लाख रुपयांचा गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूचा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणात ३७ जणांना अटक करण्यात आली असून ३१ आस्थापना सील करण्यात आल्या आहेत.



अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी ३० आणि ३१ मे रोजी एपीएमसी बाजारपेठेसह नवी मुंबई व ठाणे परिसरात अचानक तपासणी मोहीम राबवली. उन्हाळ्यात आंब्यांची वाढलेली मागणी लक्षात घेता काही व्यापारी फळांवर थेट इथिलिनसदृश स्प्रे फवारून ती कृत्रिमरीत्या पिकवत असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली होती. त्यानुसार फळ मार्केटमधील एक्सपोर्ट हाऊससह विविध ठिकाणी कारवाई करण्यात आली. तपासणीत अशा प्रकारे आंबे पिकवणाऱ्या तीन आस्थापनांवर कारवाई करण्यात आली.

या कारवाईत ३,४५३ किलो आंबे जप्त करण्यात आले. त्यांची किंमत ११ लाख १२ हजार ८५० रुपये इतकी आहे. अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाच्या नियमांनुसार फळांवर थेट इथिलिन स्प्रेचा वापर करण्यास बंदी आहे. फळे पिकवण्यासाठी केवळ मान्यताप्राप्त इथिलिन गॅस चेंबरचा वापर करण्याची परवानगी आहे. जप्त करण्यात आलेल्या आंब्यांचे नमुने प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असून अहवालानंतर संबंधितांवर पुढील कारवाई केली जाणार आहे. विशेष म्हणजे ज्या एक्सपोर्ट हाऊसमध्ये ही कारवाई करण्यात आली तेथून मध्य पूर्व, युरोप आणि इतर आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणात आंबे, फळे आणि भाजीपाल्याची निर्यात केली जाते. एपीएमसीतील ही इमारत निर्यात व्यवसायासाठी महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे या कारवाईमुळे निर्यातीसाठी हाताळल्या जाणाऱ्या फळांच्या गुणवत्तेबाबतही प्रश्न उपस्थित झाले असून व्यापारी वर्तुळात खळबळ उडाली आहे.

दरम्यान, जागतिक तंबाखूविरोधी दिनानिमित्त २९ ते ३१ मे या कालावधीत प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखूच्या विक्रीविरोधातही विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान ३६ आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. एकूण ४ लाख ७४ हजार ४०७ रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला असून संबंधितांविरोधात विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## आगरी-कोळी संस्कृती : पनवेल-उरणचा आत्मा

विमानतळ, बंदर, एमआयडीसी, मेट्रो यामुळे पनवेल–उरणचा विकास होत असला तरी या विकासाच्या गडबडीत आपली मुळे विसरता कामा नयेत. या भागाचा आत्मा म्हणजे इथली आगरी–कोळी संस्कृती असल्याचे मत संस्कृती अभ्यासकांकडून व्यक्त होत आहे. घावणे–आंबोळी, वडे, उकडीचे मोदक, पिठलं–भात ही इथली खाद्यसंस्कृती. नटवा, जाखडी, कोळीनृत्य ही लोककला. शिमगा, काल्र्याची जत्रा, गावदेवीची यात्रा हे इथले प्रमुख सण.

शिमगा हा पनवेल–उरणचा सर्वात मोठा सण मानला जातो. होळी पेटवणे, बोंबील खाणे, नाचणे, फटाके वाजवणे, पालखी नाचवणे यात अख्खा गाव एकत्र येतो. घराघरात गोडाधोडाचे जेवण असते. उरणचा शिमगा विशेष प्रसिद्ध आहे.गावदेवीच्या यात्रा, भरणी, लग्नातील 'हळदी'चे कार्यक्रम, गणपती हे सर्व समाजाला एकत्र बांधून ठेवतात. लग्नात 'मांडव परतणी'ची गाणी, 'झिम्मा–फुगडी' आजही गावांमध्ये पाहायला मिळतात. विकासाबरोबर बाहेरून मोठ्या प्रमाणात लोक येथे येत असल्याने स्थानिक संस्कृती लोप पावण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे ही संस्कृती जपणे गरजेचे आहे.




शाळांमध्ये मुलांना आगरी–कोळी बोली, गाणी, नृत्य शिकवावीत. 'संस्कृती संवर्धन मंडळे' स्थापन करावीत. शिमगा, नारळी पौर्णिमा हे सण मोठ्या प्रमाणात साजरे करावेत. त्याचे डॉक्युमेंटेशन करून युट्यूबवर व्हिडिओ प्रसारित करावेत, अशी मागणी होत आहे.पर्यटन वाढवताना 'कल्चरल टुरिझम'वर भर द्यावा. पर्यटकांना आगरी पद्धतीचे जेवण, राहणीमान, सण अनुभवायला द्यावेत. 'होम स्टे' संकल्पना राबवल्यास स्थानिकांना रोजगार मिळेल आणि संस्कृतीचे जतनही होईल. विमानतळावर, मेट्रो स्टेशनवर, हॉटेल्समध्ये आगरी–कोळी संस्कृतीचे दर्शन घडवणारी शिल्पे, चित्रे लावावीत.

'वेलकम टू पनवेल' म्हणताना संस्कृतीही दिसली पाहिजे, अशी अपेक्षा आहे. पेणचा गणपती, उरणचा बोंबील, करंजाची मासळी, पनवेलचा वडापाव हे आपले ब्रँड आहेत.

(साभार : इंटरनेट)

# रायगडच्या किनाऱ्यावर सहा हजार मच्छीमारी बोटी विसावल्या!

## पुढील दोन महिने खोल समुद्रातील मासेमारीला ब्रेक

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पावसाळी हंगामाच्या पार्श्वभूमीवर खोल समुद्रातील मासेमारी बंदीचा कालावधी १ जूनपासून सुरु झाला आहे. त्यामुळे खोल समुद्रातील मासेमारी बंद झाली आहे. या बंदीमुळे जिल्ह्यातील एकूण ६ हजार १२९ मच्छिमार बोटी समुद्रात किनाऱ्यावर विसावल्या आहेत. हा बंदी कालावधी ३१ जुलैपर्यंत असून १ ऑगस्टपासून पुन्हा मासेमारी सुरु होईल.

मत्स्यव्यवसाय विभागाच्या माहितीनुसार, रायगड जिल्ह्यातील ४ हजार २९३ मोटारचलित आणि यांत्रिक बोटींचा समावेश या बंदीत आहे. याशिवाय १८३६ बिगर-मोटारचलित बोटी देखील समुद्रात जाणार नसल्याने संपूर्ण किनारपट्टीवर मासेमारी व्यवहार मंदावणार आहेत.

दरवर्षी मान्सूनपूर्व काळात ही बंदी लागू केली जाते. समुद्रात या काळात वादळी वारे, उंच लाटा आणि



खराब हवामान निर्माण होत असल्याने मच्छिमारांच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही हा निर्णय महत्त्वाचा मानला जातो.

रायगड जिल्ह्यात अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन, म्हसळा, उरण आणि पनवेल परिसरातील अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर मासेमारी व्यवसाय चालतो. या व्यवसायावर हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. बंदी काळात मासेमारी पूर्णपणे ठप्प होत असल्याने अनेक मच्छिमार पर्यायी कामांकडे वळतात.

काहीजण बोटींची दुरुस्ती, जाळ्यांची निगा, रंगकाम आणि अन्य देखभाल कामे करतात. मासेमारी बंदीमुळे बाजारात ताज्या मासळीची आवकही कमी होण्याची शक्यता आहे. परिणामी मासळीचे दर वाढण्याची शक्यता व्यापाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. विशेषतः कोळंबी, सुरमई, बांगडा आणि पापलेट यांसारख्या मासळीची मागणी वाढते.

त्यामुळे नागरिकांना गोठवलेली अथवा इतर जिल्ह्यांतून येणाऱ्या मासळीवर अवलंबून राहावे लागू शकते. दरम्यान, मत्स्यव्यवसाय विभागाने मच्छिमारांना बंदी कालावधीत नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे.

बंदी काळात समुद्रात मासेमारी करताना आढळणाऱ्या बोटीवर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. किनारपट्टी भागात गस्त वाढविण्यात येणार असून संबंधित विभागांकडून नियमित पाहणी केली जाणार आहे. मान्सूननंतर पुन्हा मासेमारी हंगाम सुरू होणार असून, त्यासाठी मच्छिमारांकडून आतापासूनच तयारी सुरू करण्यात आली आहे.

# पोलादपूरमध्ये चार गुरांसह वाहन पोलिसांच्या ताब्यात

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कापडे गावाच्या हद्दीत अवैधरित्या गुरांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर गोरक्षकांनी तत्पर कारवाई करत एक पिकअप वाहन रोखून धरले. चार गुरांसह पिकअप वाहन पोलादपूर पोलिस ठाण्याच्या आवारात उभे करून पोलीस कारवाईचे आवाहन गोरक्षकांकडून करण्यात आले.

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातून चार गुरे घेऊन जाणारी पिकअप गाडी((एम एच १३ सीई१९७६) कापडे गावाच्या हद्दीतून जात होती. या पिकअप गाडीतून गुरांची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती गोरक्षकांना मिळाल्यानंतर त्यांनी जाऊन पिक अप वाहनाची तपासणी केली. यावेळी वाहनामध्ये चार गुरे आढळून आली. हे वाहन व गुरे गोरक्षकांनी पोलादपूर पोलीस ठाण्यात



जमा केले. या प्रकरणी पोलिसांनी पुढील चौकशी सुरू केली आहे. पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे अंमलदार अनुज शिंदेया प्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

# कर्जत आगारात एसटीचा ७८वा वर्धापन दिन साजरा



**कर्जत : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात एसटी बस सुरु झाली. त्याला ७८ वर्ष झाली. त्यानिमित्ताने कर्जत एसटी आगारात वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. केक कापून प्रवाशांना लाडू वाटून वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

एसटी आगारात वर्धापन सोहळ्यानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. रेश्मा खडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उदघाट्न केले. आगार व्यवस्थापक देवानंद मोरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. याप्रसंगी जेष्ठ प्रवासी कान्हू पवार, कोकण एस टी प्रेमी संघटनेचे फरहान होडेकर, महेश खडे, सहाय्यक वाहतुक निरीक्षक महादेव पालवे, दीपक देशमुख आदी उपस्थित होते. कान्हू पवार यांच्या हस्ते केक कापण्यात आला. त्यानंतर प्रवाशांना लाडू वाटण्यात आले.

याप्रसंगी प्रा. खडे यांनी, ' एस टी जरी निर्जीव असली तरी चालक व वाहक आणि कर्मचाऱ्यांमुळे एस टी सजीव होऊन प्रवाशांची सेवा करीत आली आहे. एस टी ने अनेकांचे जीवन मार्गी लावली आहे. अजूनही ग्रामीण भागातील जनता एस टी वर अवलंबून आहे. एस टी म्हणजे सुरक्षित व वेळेवर प्रवास म्हणून तिच्यावर प्रेम करणारे अजूनही आहेत.' असे सांगितले. आगार व्यवस्थापक मोरे यांनी, 'या आगारात ६० कर्मचारी कमी आहेत. तरी सुद्धा आहेत त्या कर्मचाऱ्यांना बरोबर घेऊन आगार चांगल्या प्रकारे चालण्यासाठी प्रयत्न करीत आहोत.' असे सांगितले. सूत्रसंचालन दीपक देशमुख यांनी केले.

याप्रसंगी वाहतूक नियंत्रक संजय कोंडार,विलास बागुल, अरुण थोराड, कृष्णा शिंदे, अनुजा सुरावकर,, संगीता शिरगिरे, मेघा कालवणकर, संतोष फराट आदींसह प्रवाशी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अलिबाग तालुक्यातील खंडाळे आयुष्यमान आरोग्य केंद्राला राष्ट्रीय प्रमाणपत्र

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानकांतर्गत अलिबाग तालुक्यातील खंडाळे आयुष्यमान आरोग्य केंद्राने राष्ट्रीय स्तरावर प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. विशेष म्हणजे जिल्ह्यात सर्वाधिक ९२ गुण प्राप्त झालेले खंडाळा हे पहिलेच आयुष्यमान आरोग्य केंद्र ठरले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील आरोग्य विभागाच्या सातत्यपूर्ण सेवेचा हा गौरव झाला आहे. राष्ट्रीय पथकाने खंडाळा येथे मार्चमध्ये आरोग्य केंद्रांची पाहणी केली होती. यानंतर २२ मे रोजी निकाल जाहीर करण्यात आला.

राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानके (एनएक्यू) हा भारत सरकारच्या आरोग्य मंत्रालयांतर्गत राबविण्यात येणारा महत्त्वाचा गुणवत्ता कार्यक्रम आहे. शासकीय आरोग्य संस्थांमधील



सेवेची गुणवत्ता, औषध व साधनसामग्री व्यवस्थापन, रुग्ण तपासणी व त्यांचे समाधान, स्वच्छता आदी गोष्टींचे सखोल मूल्यमापन करण्यात येते. या अंतर्गत खंडाळे आयुष्यमान केंद्राला प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. हे यश केवळ गुणांचे नसून दर्जेदार, रुग्णकेंद्रित, सुरक्षित व शिस्तबद्ध आरोग्य सेवा देण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण आणि सामुहिक प्रयत्नांचे फलित आहे.

या उल्लेखनीय यशासाठी आयुष्यमान आरोग्य केंद्र खंडाळेच्या समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता म्हात्रे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अश्विनी सपकाळ, प्राथमिक आरोग्य केंद्र पोयनाडचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पद्मश्री आंधळकर, आरोग्य सेविका मनस्वी वाईरकर, आरोग्य सेवक रवींद्र पगारे व आशा कार्यकर्ता नेत्रा घरत, स्मिता थळे, नीता घरत, राखी घाटकर, सीमा भगत, श्वेता पाटील, दिपाली मोरे यांनी मेहनत घेतली.

# पोलादपूर तालुक्यात बियाणे आणि खताचा मुबलक साठा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील शेतकरी जनतेसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाने मुबलक बियाणे विक्रीसाठी उपलब्ध असल्याने खरेदीचे आवाहन केले आहे. काही दिवसांपूर्वी पोलादपूर तालुक्यातील शेतकऱ्यांना राजकीय व्यासपीठावरून विविध वाणाचे बियाणे व युरिया खतांचे मोफत वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थित नसलेल्या शेतकऱ्यांना हे आवाहन करण्यात आले आहे.

सध्या खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये पोलादपुर तालुक्यामध्ये कृषि सेवा केंद्रामध्ये भात पिकाच्या विविध वाणांचे व कंपन्यांचे मुबलक बियाणे विक्रीसाठी उपलब्ध आहे. तसेच सद्या तालुक्यामध्ये कृषि सेवा केंद्रांमध्ये २५० टन युरिया खत उपलब्ध आहे. तसेच यापुढे देखील खत पुरवठा होणार आहे. खते व बियाणे कृषि सेवा केंद्रांमधुन खरेदी करताना शेतर्कयांनी आधार कार्ड व मोबाईल नंबर द्यावेत. तसेच बियाणे खरेदी करताना खरेदीचे पक्के बिल दुकानदाराकडून घ्यावे व सदर बिल खरीप हंगामामध्ये जतन करुन ठेवावे. कृषि अधिकारी यांनी सांगीतले आहे.

# वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात पर्यटनस्थळे जास्त प्रमाणात असल्याने येथे पर्यटक अधिक संख्येने येत असतात. त्याचा वाहतूकीवरही परिणाम होतो. त्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सोमवार (दि.१) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३२३ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून३,१६,६००/- रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या या सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

# कोलाड नाभिक समाजाच्या वतीने पं.स. सभापती विजया पाशिलकर यांचा सत्कार

**धाटाव : प्रतिनिधी**

कोलाड नाभिक समाजाच्या वतीने रोहा पंचायत समितीच्या सभापती विजया विनोद पाशिलकर यांचा नुकताच विष्णू निवास, धाटाव येथे भेट घेऊन सन्मान करण्यात आला. यावेळी समाजाच्या विविध प्रश्नांबाबत चर्चा करण्यात आली तसेच समाजाच्या वतीने त्यांना सुशोभीकरणासाठी निवेदनही सादर करण्यात आले.

या निवेदनामध्ये पाले-आंबेवाडी येथील कै. पांडुरंग सकपाळ सभागृहासाठी आर्थिक निधी उपलब्ध



करून देण्याची मागणी करण्यात आली. समाजाच्या मागणीची दखल घेत सभापती विजया पाशिलकर यांनी कोणताही विलंब न लावता सभागृहासाठी तीन लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.यावेळी कोलाड नाभिक समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी सभापती विजया पाशिलकर यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. .

कै.पांडुरंग सकपाळ सभागृहाच्या उभारणीसह इतर सामाजिक कार्यांसाठी यापूर्वीही पाशिलकर कुटुंबाकडून भरीव आर्थिक मदत मिळाल्याचे समाजबांधवांनी नमूद केले. त्यामुळे कोलाड परिसरातील नाभिक समाजासाठी पाशिलकर कुटुंब हे केवळ लोकप्रतिनिधी नसून एक विश्वासार्ह आधारस्तंभ असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

या प्रसंगी कोलाड नाभिक समाजाचे कार्याध्यक्ष सदानंद साळुंके, रायगड जिल्हा नाभिक समाजाचे विश्वस्त यशवंतराव खराडे, किरण खंडागळे, विभागीय अध्यक्ष विजय रावकर, संतोष रावकर, विनायक दिवेकर, यशवंत मोहिते, उत्तम साळुंके , किशोर खंडागळे , यांच्यासह नाभिक समाजाचे अनेक पदाधिकारी व बांधव उपस्थित होते.

# कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत प्रक्रिया युनिट

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

कडधान्य पिकांच्या मुल्यवर्धनास चालन देऊन शेकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे या उद्देशाने काढणीनंतरची पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी कडधान्य प्रक्रिया युनिट स्थापन करण्यास आर्थिक सहाय्य प्रदान करणे या योजनेंतर्गत शेतकरी उत्पादक संस्था FPO क्लस्टर स्तर महासंघ CLF प्राथमिक कृषी पतसंस्था PACS उद्योजक तसेच प्रक्रिया युनिट स्थापन करण्यास इच्छुक इतर पात्र व्यक्ती/संस्था यांना सहाय्यक देऊन कडधान्य मूल्यसाखळी अधिक कार्यक्षम व सक्षम करणे हा मुख्य उद्देश असून याकरिता इच्छूकांनी कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत प्रक्रिया युनिट करिता अर्ज सादर करावेत असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती वंदना शिंदे यांनी केले आहे.

योजना- कडधान्य आत्मनिर्भरता अभियान, बाब/घटक प्रक्रिया युनिट, पीक कडधान्य, अनुदान दर प्रकल्प खर्चाच्या ३३ % किंवा जास्तीत जास्त रु. २५ लाख प्रति युनिट यापैकी जे कमी असेल ते.

पात्र लाभार्थी घटक-योजनेंतर्गत खालील घटकांना आर्थिक सहाय्य देण्यात येईल, शेतकरी उत्पादक संस्थ (FPOs), क्लस्टर स्तर महासंघ (CLFs), प्राथमिक कृषी पतसंस्था (PACS), वैयक्तिक अर्जदार, कोणत्याही अधिनियमांतर्गत नोंदणीकृत इतर उपक्रम


पात्रता निकष - गट लाभार्थी- संबंधित संस्था किमान मागील दोन वर्षांपासून विधिवत नोंदणीकृत व कार्यरत असावी. प्रकल्प खर्चाच किमान १५ टक्के रक्कम तसेच कार्यभांडवलासाठी आवश्यक मार्जिन मनी स्वतः उभारण्याची आर्थिक क्षमता असावी.


वैयक्तिक लाभार्थी-

अर्जदाराचे वय किमान २१ वर्षे पूर्ण असावे. एका कुटुंबातील (स्वतः पती/पत्नी व अविवाहित मुले) केवळ एका व्यक्तीस आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात येईल. प्रकल्प खर्चाच्या किमान १५ टक्के रक्कम तसेच कार्यभांडवलासाठी आवश्यक मार्जिन मनी स्वतः उभारण्याची आर्थिक क्षमता असावी, अनुसूचित जाती/जमाती, महिला, डोंगराळ क्षेत्रे व आकांक्षी जिल्हे यांना प्राधान्य असेल

अर्थसहाय्य प्रमाण-आर्थिक सहाय्य - प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल रु. २५.०० लाख प्रति युनिट (यापैकी जे कमी असेल ते) अनुदान केवळ यंत्र सामग्री खरेदी तसेच इमारत/गोदाम/साठवण पायाभूत बांधकामासाठी दिले जाईल. जमीन वीज मनुष्यबळ इत्यादी खर्चासाठी अनुदान देय राहणार नाही. तसेच इमारत/गोदाम/साठवण पायाभूत सुविधा बांधकामासाठी दिले जाईल.

# मुरूडमध्ये शेतात बियाणे पेरणीला सुरुवात





**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड शहरांसह पंचक्रोशी भागांमध्ये खरीप हंगामाच्या तयारीला वेग आला असून शेतकरी शेतात बियाणे पेरणीचे काम सुरू करताना दिसत आहेत. पावसाचे आगमन जवळ आल्याने अनेक ठिकाणी शेतात मशागतीची कामे पूर्ण करून बियाणे व खतांची जुळवाजुळव करण्यात शेतकरी व्यस्त आहेत.अनेक ठिकाणी ट्रॅक्टरच्या साहाय्याने नांगरणी, मशागत आणि पेरणीची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत.

मुरुड तालुक्यात ३३०० हेक्टर क्षेत्रात भात पिक घेतले जाते. मुरुड तालुक्यात सर्वाधिक भात शेती केली जाते.मुरूड कुंभार

## खरीप हंगामाची तयारी सुरू

वाड्यातील शेतकरी प्रसाद विलास जळगावकर व प्रसन्न जाळगावकर यांनी आपल्या शेतात मशागतीची कामे पूर्ण करून भात पिकांसाठी बियाणे पेरणीची तयारी केली आहे.

तालुक्यात ३३०० हेक्टर भात लागवडीचं क्षेत्र आसुन या क्षेत्रामध्ये शेतकरी सुवर्णा, जया, रूपाली, चिंटू, वाडा कोलम, रत्ना,शुभांगी, कर्जत व खारपट्यात जमिनीवर - पनवेल, इत्यादी भाताच्या जातीची लागवड केली जाते.यंदा पावसाचे प्रमाण सम राहणार असून लागवडी साठी पोषक पाऊस पडणार आहे.

मागील वर्षी मुरुड तालुक्यात सर्वाधिक २८०० मिलिमीटर एवढा पाऊस बरसला होता. परंतु यंदा हवामान खात्याने पाऊसाचे प्रमाण कमी राहणार असल्याचे सांगितले आहे . त्यामुळे यंदा किमान जर हवामान खात्याचा अंदाज खरा ठरला तर पाऊस किमान १८०० ते २००० मिलिमीटर एवढा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

एवढा पाऊस सुद्धा भात शेतीस अनुकूल ठरणार आहे. परंतु शेवटच्या टप्यात पाऊस कायम राहणे खुप गरजेचे आहे. तरी सुद्धा शेतकरी वर्ग आशावादी असून यंदा सुधा माफक पाऊस पडून भात शेती भरून येईल असा अंदाज व्यक्त करीत आहेत.

# अंबर्ले येथे भव्य हिंदू संमेलन उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

सनातन धर्म, भारतीय संस्कृतीचे संरक्षण, राष्ट्रभक्ती आणि हिंदू समाजातील एकता दृढ करण्याच्या उद्देशाने अंबर्ले मंडळाच्या वतीने रविवारी दि. ३१ मे २०२६ दुर्गामाता मंदिर सभामंडप, अंबर्ले येथे भव्य हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले. अंबर्ले, न्हावे, मांगरूळ, वाघोसे, खडकोली, पनवेल बुद्रुक, पनवेल खुर्द, वडाचा कोंड, कातळाचा कोंड आदी गावांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या संमेलनास सुमारे १५० हिंदू बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाची सुरुवात भक्तिमय भजन संध्येने झाली. स्थानिक भजनी मंडळे व युवकांनी सादर केलेल्या अभंग, भक्तिगीत आणि विठ्ठल नामस्मरणामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. त्यानंतर रश्मी श्रीनिवास वारखंडकर यांनी उपस्थित मान्यवर व नागरिकांचे स्वागत केले. अध्यक्ष जितेंद्र अंधेरे यांच्या हस्ते प्रमुख वयांचा सत्कार करण्यात आला. तसेच भारतमाता आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून मुख्य कार्यक्रमास प्रारंभ झाला.

संमेलनाचे वक्ते अजित शेडगे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याचा इतिहास, उद्दिष्टे आणि राष्ट्रनिर्माणातील योगदान याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी संघाच्या 'पंचपरिवर्तन' अभियानातील सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण संवर्धन, स्वबोध आणि नागरिक शिष्टाचार या पाच महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर विवेचन केले.



# हरमनप्रीत कौरचा विश्वविक्रम

## महिला क्रिकेटमध्ये सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळणारी ठरली खेळाडू

**लंडन : वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेआधी हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघाला इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या आणि निर्णायक सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. या सामन्यातील पराभवासह टीम इंडियाने तीन सामन्यांची टी-२० मालिका गमावली, पण या सामन्यात कर्णधार हरमप्रीत कौरच्या नावे विश्वविक्रमाची नोंद झाली आहे.



न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात मैदानात उतरताच सुजी बेट्सला मागे टाकत ती महिला क्रिकेटमधील सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळणारी खेळाडू ठरली आहे. इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात हरमनप्रीत कौरने आपला ३६८वा आंतरराष्ट्रीय सामना खेळला. यासह तिने न्यूझीलंडच्या सुजी बेट्स (३६७ सामने) हिला मागे टाकत महिला क्रिकेटमध्ये सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळण्याचा नवा विश्वविक्रम आपल्या नावे केला.

हरमनप्रीतने इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या आणि अखेरच्या टी-२० सामन्यात ४० चेंडूत सात चौकाराच्या मदतीने ५६ धावांची नाबाद खेळी केली. इंग्लंडविरुद्धच्या ३२व्या टी-२० सामन्यात तिच्या बॅटमधून पहिले अर्धशतक आले. टीम इंडियाकडून स्मृती मानधनापाठोपाठ आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये सर्वाधिक १८ वेळा फिफ्टी प्लस धावा करणारी ती दुसरी फलंदाजही ठरली. माजी कर्णधार मितालीला मागे टाकत हा विक्रम तिने आपल्या नावे केला.

### वर्ल्डकपमध्ये साकारणार खास विक्रम

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला संघ आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेत खेळताना दिसेल. वनडे वर्ल्डकप स्पर्धेनंतर ती टीम इंडियाला टी-२० चॅम्पियन करणार का? हे पाहण्याजोगे असेल. या स्पर्धेतही हरमनप्रीत मैदानात उतरताच खास विक्रम प्रस्थापित करेल. आतापर्यंतच्या महिला टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील पहिल्या नऊ हंगामात हरमनप्रीत संघाचा भाग राहिली आहे. सलग दहाव्यांदा ती वर्ल्डकप खेळताना दिसणार आहे. हा एक खास विक्रमच ठरेल.

# राज्य पॉवरलिफ्टिंग इक्विप्ड स्पर्धेत रायगडची चमक

## गायत्री बडेकर, रौनक जितेकर किताब विजेते

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिनियर, ज्युनिअर व सब ज्युनिअर, मास्टर्स पुरुष व महिला आणि अंध व गतिमंद दिव्यांग गटाची राज्य पॉवरलिफ्टिंग इक्विप्ड अजिंक्यपद स्पर्धा नुकतीच मुंबईतील वडाळा येथील ज्ञानेश्वर विद्यालयात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

सब ज्युनिअर महिला गटात गायत्री महेश बडेकर (आयएनडी क्लब, कर्जत) हिने सुवर्णपदकासह स्ट्राँग वूमन ऑफ महाराष्ट्र आणि रौनक रोशन जितेकर (चेतन जिम, दापोली पारगाव) याने सब ज्युनिअर गटात स्ट्राँग मॅन ऑफ महाराष्ट्र हा किताब पटकावला. गायत्रीला राष्ट्रीय खेळाडू हनुमंत खरात, तर रौनकला विशाल मुळ्ये (मुंबई उपनगर) यांचे मार्गदर्शन लाभले.



रायगडच्या खेळाडूंनी चार सुवर्ण, दोन रौप्य आणि एक कांस्य अशी एकूण सात पदके आणि दोन किताब प्राप्त केले. रायगडच्या या प्रगतीबाबत महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव संजय सरदेसाई यांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच संघ व्यवस्थापक संदीप पाटकर, सहाय्यक सुभाष टेंबे आणि प्रशिक्षक रामचंद्र गावडे यांनी आनंद व्यक्त केला आहे.

पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष गिरीश वेदक, सचिव अरुण पाटकर, सहसचिव सचिन भालेराव, सदस्य मानस कुंटे, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, खजिनदार राहुल गजरमल यांनीसुद्धा खेळाडूंचे, त्यांच्या प्रशिक्षकांचे तसेच स्पर्धेसाठी प्रोत्साहन देणाऱ्या पालकांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी खेळाडूंना शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

**पदक विजेते खेळाडू खालीलप्रमाणे**

सुवर्ण : गायत्री महेश बडेकर (सब ज्युनिअर, ४७ किलो वजनी गट, आयएनडी कर्जत), जान्हवी बडेकर (सब जुनिअर मुली ६९ किलो वजनी गट, आयएनडी क्लब कर्जत), रौनक रोशन जितेकर (सब ज्युनिअर मुले १०५ किलो वजनी गट, चेतन जिम दापोली पारगाव), महेश कृष्णा पाटील (मास्टर २, ६६ किलो वजनी); रौप्य : अंजली येवले (ज्युनियर ६९ किलो वजनी गट, आयएनडी क्लब कर्जत), रामचंद्र सखाराम गावडे (मास्टर३, ६० वर्षावरील, वैयक्तिक); कांस्य : यश गायकवाड (कांस्य पदक, ज्युनियर १०५ किलो वजनी गट, आयएनडी कर्जत).

# नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस असोसिएशनच्या मान्यतेने नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळातर्फे नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा १३ व १४ जून रोजी नवीन पनवेल सेक्टर १८ येथील सिडको समाजमंदिरात होणार आहे.

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम यांच्या हस्ते १३ जून रोजी सकाळी ९.३० वाजता करण्यात येणार आहे. स्पर्धेचे चीफ रेफरी म्हणून डी.आर. साळसकर व शामल यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे

स्पर्धा विविध गटांमध्ये होईल. यात बिगिनर मुले आणि मुली, ११, १३, १५, १७, १९ वर्षांखालील मुले आणि मुली, महिला व पुरुष, वेटरन पुरुष ४० वर्षावरील अशा गटांचा समावेश आहे. स्पर्धेत नवी मुंबई तसेच रायगड जिल्ह्यातील नामवंत खेळाडू सहभागी होणार आहेत. विजेत्यांना रोख रक्कम, प्रमाणपत्र आणि आकर्षक चषक देऊन गौरविण्यात येणार आहे.

# टीम इंडियाच्या न्यूझीलंड दौऱ्याचे वेळापत्रक जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत-न्यूझीलंड यांच्यातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या द्विपक्षीय मालिकेचे वेळापत्रक समोर आले आहे. टीम इंडिया ऑक्टोबरमध्ये न्यूझीलंड दौऱ्यावर जाणार असून या दौऱ्याचे संपूर्ण वेळापत्रक न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने जाहीर केले आहे. या दौऱ्यात टी-२०, वनडे आणि कसोटी सामने खेळवले जाणार आहेत. ही मालिका दोन्ही संघांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरेल.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील दौऱ्याची सुरुवात पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेने होईल. मालिकेतील पहिला सामना २२ ऑक्टोबर रोजी खेळवला जाईल, तर पाचवा आणि अखेरचा टी-२० सामना १ नोव्हेंबरला हॅमिल्टन येथे होणार आहे.

टी-२० मालिकेनंतर दोन्ही संघांमध्ये पाच सामन्यांची वनडे मालिका रंगेल. २०२७च्या वनडे विश्वचषकाच्या तयारीच्या दृष्टीने ही मालिका महत्त्वाची असेल, तर कसोटी मालिका वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) अंतर्गत खेळवली जाणार आहे. भारतीय संघासाठी ही कसोटी मालिका अधिक महत्त्वाची आहे, कारण सध्या डब्ल्यूटीसी गुणतालिकेत भारत खालच्या स्थानावर आहे.



या दौऱ्यात एकूण १२ सामने खेळवले जाणार आहेत. त्यामुळे हा न्यूझीलंड क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात मोठा आंतरराष्ट्रीय दौरा ठरणार आहे. २०१९नंतर प्रथमच भारत आणि न्यूझीलंड यांच्यात न्यूझीलंडमध्ये कसोटी मालिका खेळली जाणार आहे.

### असे आहे वेळापत्रक

**टी-२० मालिका**

**पहिला सामना :** २२ ऑक्टोबर, क्राइस्टचर्च
**दुसरा सामना :** २४ ऑक्टोबर, क्राइस्टचर्च
**तिसरा सामना :** २७ ऑक्टोबर, वेलिंग्टन
**चौथा सामना :** ३० ऑक्टोबर, ऑकलंड
**पाचवा सामना :** १ नोव्हेंबर, हॅमिल्टन

**वनडे मालिका**

**पहिला सामना :** ४ नोव्हेंबर, ऑकलंड
**दुसरा सामना :** ७ नोव्हेंबर, वेलिंग्टन
**तिसरा सामना :** १० नोव्हेंबर, हॅमिल्टन
**चौथा सामना :** १३ नोव्हेंबर, माउंट माउंगानुई
**पाचवा वनडे सामना :** १५ नोव्हेंबर, माउंट माउंगानुई

**कसोटी मालिका**

**पहिला सामना :** १९ ते २३ नोव्हेंबर, वेलिंग्टन
**दुसरा सामना :** २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर, क्राइस्टचर्च



# उरणच्या आठ खेळाडूंची महाराष्ट्र आईस हॉकी संघात निवड

**उरण : बातमीदार**

उरणमधील तब्बल आठ खेळाडूंनी महाराष्ट्र आईस हॉकी संघात स्थान मिळवून तालुक्याचा नावलौकिक वाढवला आहे. असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी या खेळाडूंची निवड झाली असून ते उत्तराखंडमधील डेहराडून येथे महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

१२ वर्षांखालील गटात वरदा आसरकर, शिवांश तांडेल, १५ वर्षांखालील गटात अर्थ सावंत, रुद्र घरत, रेवा पाटील, १८ वर्षांखालील गटात सुरज करन आणि सीनियर गर्ल्स गटात स्नेहा शेळके, शर्वणी या सर्व विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले. या खेळाडूंना श्री स्केटिंग अकॅडमी संस्थापक व प्रशिक्षक प्रीती पाटील आणि राकेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

# आयपीएल गाजवताच वैभव सूर्यवंशीचा भाव वधारला!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेतील १९व्या हंगामात १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने मोठा धमाका केला. सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत अव्वलस्थानी राहून ऑरेंज कॅपसह त्याने पाच वेगवेगळ्या पुरस्कारांसह लाखो रुपयांचे बक्षीस मिळवले. आता त्याची ब्रँड व्हॅल्यू पूर्वीच्या तुलनेत आणखी वाढली आहे.

वैभव सूर्यवंशी हा आयपीएलमधील सर्वात महागडा युवा बॅटर आहे. राजस्थान रॉयल्सच्या संघाने एक कोटी १० लाख रुपयांसह त्याला आपल्या संघात घेतले. गत हंगामात पदार्पण करताना विक्रमी शतकासह त्याने ट्रेलर दाखवला. यंदाच्या हंगामात धमाकेदार कामगिरीसह त्याने सुपर हिट पिक्चरच रिलीज केला. आगामी काळात त्याच्यावर विक्रमी बोली लागेल, अशी चर्चा रंगत आहे.



त्याआधी जाहिरातीच्या माध्यमातून होणारी कमाई वाढली आहे. याआधी वैभव एका जाहिरातीसाठी एक कोटी रुपयांपर्यंत फी आकारत होता, पण आता त्याने आपली फी वाढवल्याची माहिती समोर येत आहे.

वैभव सूर्यवंशी याने कॉम्प्लान आणि रेड बुलसारख्या ब्रँड्ससोबत डील केली आहे. आयपीएल २०२६च्या हंगामाआधी त्याने बहुतांश करार हे एक कोटी रुपयांच्या आसपास आहेत, पण आता त्याचा भाव वाढला असून एका जाहिरातीसाठी तो १.५ ते दोन कोटी एवढी फी आकारत आहे.

**ब्रँड व्हॅल्यू वाढली**

वैभव सूर्यवंशीने आयपीएल २०२६मध्ये तब्बल पाच पुरस्कार जिंकले. यामध्ये ऑरेंज कॅप, मोस्ट व्हॅल्युएबल प्लेयर ऑफ द सीझन, मोस्ट सिक्सेस इन द सीझन, इमर्जिंग प्लेयर ऑफ द सीझन, सुपर स्ट्रायकर ऑफ द सीझन या पुरस्कारांचा समावेश होता. वयाच्या अवघ्या १५व्या वर्षी आयपीएलमधील धमाकेदार कामगिरीच्या जोरावर वैभव हा जळपास १० कोटींचा मालक आहे. यात आयपीएल करारासह सामना फी आणि जाहिरातीच्या माध्यमातून होणाऱ्या कमाईचा समावेश आहे.

# साईराज बहुतुले टीम इंडियाच्या फिरकी गोलंदाजी प्रशिक्षकपदी

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात ६ जूनपासून सुरू होणाऱ्या एकमेव कसोटी सामन्यापूर्वी बीसीसीआयने माजी फिरकीपटू साईराज बहुतुले यांची टीम इंडियाच्या फिरकी गोलंदाजी प्रशिक्षकपदी नियुक्ती केली आहे.

५३ वर्षीय बहुतुले वनडे आणि टी-२० क्रिकेटमध्येही भारतीय फिरकीपटूंना मार्गदर्शन करणार आहेत. भारतीय संघाकडे यापूर्वी स्वतंत्र स्पिन गोलंदाजी प्रशिक्षक नव्हता. आता बहुतुले हे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि जलदगती गोलंदाजीचे प्रशिक्षक मोर्ने मोर्केल यांच्यासोबत काम करतील.



साईराज बहुतुले आयपीएल २०२६मध्ये पंजाब किंग्स संघाचे स्पिन गोलंदाजी प्रशिक्षक होते. याआधी त्यांनी देशांतर्गत क्रिकेटमध्ये केरळ आणि बंगाल संघांसोबतही काम केले आहे. २०१८ ते २०२१ या काळात ते राजस्थान रॉयल्सच्या कोचिंग स्टाफचा सदस्य होते. त्यानंतर ते नॅशनल क्रिकेट अकॅडमीशी जोडले गेले. राहुल द्रविड भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक असताना बहुतुले यांनी इंडिया-अ संघ आणि काही आंतरराष्ट्रीय मालिकांमध्ये सहाय्यक प्रशिक्षक म्हणून काम केले आहे. आयपीएल २०२५मध्ये ते एका हंगामासाठी पुन्हा राजस्थान रॉयल्ससोबत जोडले गेले होते.

### देशांतर्गत क्रिकेटमध्ये प्रभावी कामगिरी

साईराज बहुतुले यांची आंतरराष्ट्रीय कारकीर्द चढ-उतारांनी भरलेली राहिली. त्यांनी १९९७मध्ये भारतासाठी पदार्पण केले आणि २००३मध्ये शेवटचा सामना खेळला. या काळात त्यांना फक्त १० आंतरराष्ट्रीय सामने (दोन कसोटी आणि आठी वनडे) खेळण्याची संधी मिळाली. देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्यांची कामगिरी अत्यंत प्रभावी राहिली. जवळपास २० वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी १८८ प्रथम श्रेणी सामन्यांत ६३० विकेट्स, तर १४३ लिस्ट ए सामन्यांत १९७ विकेट्स मिळवल्यात.

# क्रिकेट अडकले टी-२० लीगमध्ये! आयसीसीकडून चिंता व्यक्त; विशेष समितीची स्थापना

**दुबई : वृत्तसंस्था**

क्रिकेट जगतात फ्रँचायझी टी-२० लीगमुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेटचे भवितव्य धोक्यात आले आहे. दिवसांगणिक जगभरातील वेगवेगळ्या देशात खेळवण्यात येणाऱ्या या झटपट स्पर्धांची संख्या वाढत असून अनेक स्टार क्रिकेटर राष्ट्रीय ड्युटीपेक्षा फ्रँचायझी लीगच्या ब्युटीला भुलत आहेत. या आकर्षणाचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटला फटका बसू नये यासाठी आता आयसीसीने मोठे पाऊल उचलत एक विशेष समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

जगभर झपाट्याने वाढणाऱ्या टी-२० फ्रँचायझी लीग्सच्या पार्श्वभूमीवर आयसीसी बोर्डाने विशेष समिती स्थापन करण्यास मंजुरी दिली. या समितीचे मुख्य काम फ्रँचायझी लीग आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट वेळापत्रक यांच्यात समतोल राखण्यासाठी आराखडा तयार करणे हा असेल. सध्याच्या क्रिकेट संरचनेवर कोणताही नकारात्मक परिणाम होणार



नाही, याची खात्रीदेखील ही समिती करेल.

आयसीसीच्या मते, सदस्य देशांच्या क्रिकेट बोर्डांमध्ये अशी चिंता वाढत आहे की, देशांतर्गत टी-२० लीग्सच्या विस्तारामुळे द्विपक्षीय मालिका आणि आयसीसीच्या फ्यूचर टूर प्रोग्राम (एफटीपी) वर सतत दबाव वाढत आहे. आयसीसीने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, फ्रँचायझी क्रिकेटच्या झपाट्याने वाढणाऱ्या विस्ताराबाबत बोर्डाने चिंता व्यक्त केली असून आंतरराष्ट्रीय क्रिकेट कॅलेंडर आणि फ्रँचायझी क्रिकेट यांच्यातील सुसंगतीचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

गेल्या काही वर्षांत फ्रँचायझी क्रिकेटचा विस्तार प्रचंड वेगाने झाला आहे. इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल)व्यतिरिक्त एसए२०, इंटरनॅशनल लीग टी-२०, बिग बॅश लीग, बांगलादेश प्रीमियर लीग, लंका प्रीमियर लीग, द हंड्रेड आणि कॅरेबियन प्रीमियर लीग यांसारख्या स्पर्धांनी क्रिकेट कॅलेंडरमध्ये मोठी जागा व्यापली आहे. याशिवाय यंदापासून युरोपियन टी-२० प्रीमियर लीगचीही सुरुवात होत असून त्यामुळे क्रिकेटचे वेळापत्रक आणखी व्यस्त होणार आहे.

आयसीसी बराच काळ खेळाडूंची उपलब्धता, राष्ट्रीय संघांप्रती असलेली बांधिलकी आणि फ्रँचायझी क्रिकेटच्या व्यावसायिक यशामधील संतुलन राखण्याचा प्रयत्न करत आहे. यापूर्वीही आयसीसीच्या विविध समित्यांमध्ये अशी सूचना मांडण्यात आली होती की, एका खेळाडूला एका हंगामात मर्यादित संख्येनेच फ्रँचायझी लीग्स खेळण्याची परवानगी द्यावी, जेणेकरून आंतरराष्ट्रीय क्रिकेटलाच सर्वोच्च प्राधान्य राहील. विशेषतः लहान क्रिकेट राष्ट्रांसाठी ही बाब अधिक गंभीर मानली जात आहे. कारण तेथील अनेक खेळाडू आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटपेक्षा फ्रँचायझी क्रिकेटला अधिक फायदेशीर आणि स्थिर करिअरचा पर्याय मानू लागले आहेत.

अलीकडच्या काळात अनेक मोठ्या खेळाडूंनी फ्रँचायझी क्रिकेटवर लक्ष केंद्रित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. यामध्ये निकोलस पूरन आणि हेन्रिक क्लासेन यांसारख्या मोठ्या नावांचा समावेश आहे. पूरनने वयाच्या ३० वर्षांपूर्वीच आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा केला. त्याचप्रमाणे सुनील नरेननेही बऱ्याच वर्षांपूर्वी आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणे बंद केले होते, मात्र तो अजूनही विविध फ्रँचायझी लीग्समध्ये सक्रिय आहे.

# महिला टी-२० क्रमवारीत इंग्लंडची लिन्से स्मिथ अव्वल स्थानी

**दुबई : वृत्तसंस्था**

महिला टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेला अवघे काही दिवस उरले आहेत. त्याआधी महिला टी-२० क्रमवारीत गोलंदाजीत मोठा उलटफेर झाला. इंग्लंडची लिन्से स्मिथ हिने टी-२०मध्ये नवा इतिहास रचला. पाकिस्तानच्या सादिया इक्बालला मागे टाकत स्मिथ पहिल्यांदाच अव्वलस्थानी विराजमान झाली आहे.

लिन्से स्मिथ हिने २०१८मध्ये आंतरराष्ट्रीय पदार्पण केले होते, मात्र त्यानंतर ती जवळपास पाच वर्षे राष्ट्रीय संघाबाहेर होती. २०२४ ध्ये पुनरागमन केल्यावर सातत्यपूर्ण कामगिरीसह तिने आता टी-२० वर्ल्डकपआधी नंबर वनचा डाव साधला आहे. याशिवाय महिला टी-२०मध्ये गोलंदाजी क्रमवारीत भारताच्या श्री चरणीलाही मोठा फायदा झाला आहे. ती सात स्थानांनी झेप घेत आघाडीच्या पाचमध्ये पोहचली आहे.



### भारताची श्री चरणीही ‘टॉप ५’मध्ये

न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेत सर्वोत्तम कामगिरी करताना लिन्से स्मिथने प्लेयर ऑफ द सीरिज हा पुरस्कार जिंकला होता. भारताविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात तिला एकही विकेट मिळाली नाही आणि तिने ३३ धावा दिल्या, तरीही ती अव्वल स्थानावर पोहचली. इंग्लंडची लॉरेन बेल एका स्थानाने पुढे सरकत तिसऱ्या क्रमांकावर असून भारताची युवा फिरकीपटू श्री चरणी हिने इंग्लंडविरुद्ध प्रभावी गोलंदाजी करत तब्बल सात स्थानांची झेप घेत चौथ्या स्थानावर विराजमान झाली आहे. श्री चरणीने इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेतील दोन सामन्यांत चार विकेट्स घेतल्या.

आयसीसीच्या ताज्या महिला टी-२० फलंदाजी क्रमवारीत भारताच्या जेमिमा रॉड्रिग्ज हिने चार स्थानांची झेप घेत कर्णधार हरमनप्रीत कौरसह संयुक्तपणे ११वे स्थान मिळवले आहे. इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात जेमीने ६९ धावांची शानदार खेळी केली होती. फलंदाजांच्या क्रमवारीत ऑस्ट्रेलियाची जॉर्जिया वोल अव्वल स्थानावर कायम आहे. बॅटर्सच्या यादीतील आघाडीच्या १०मध्ये स्मृती मानधना पाचव्या आणि शेफाली वर्मा सातव्या स्थानावर आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com